कोल्हापूर
बुधवार
दि. 06 मे 2026
RNI NO. MHMAR/25/A4580

# हॅलो प्रभात

कोल्हापूर आवृत्ती

▪ मुंबई ▪ पुणे ▪ सांगली ▪ सातारा ▪ सोलापूर ▪ अहिल्यानगर



▪ वर्ष : ०१ ▪ अंक : ९१ ▪ बुधवार, ०६ मे २०२६ ▪ किंमत : ३ रुपये ▪ पाने : ४

**भाड्याने देणे**

ऑफिससाठी उपयुक्त असा २५० स्के.फू.ब्लॉक भाड्याने देणे आहे.

•इंडोशिवा ॲसेट•

दुसरा मजला, गणपती मंदिरसमोर विश्रामबाग, सांगली.

संपर्क

7517219001
9011889001

# ई-ऑफिस प्रणालीला गती, प्रशासन होणार पारदर्शक

## पालकमंत्री प्रकाश आबिटकर : आधुनिक साधनांमुळे सुसूत्रता येणार

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

जिल्ह्यात 'ई-ऑफिस' प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आणि 'गतिमान प्रशासन' संकल्पनेला बळकटी देण्यासाठी महसूल विभागाला जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून संगणक व अत्याधुनिक डिजिटल साहित्याचा पुरवठा करण्यात आला आहे. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत क्षेत्रिय स्तरावर गतिमान प्रशासन तथा आपत्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण या नियमित योजनेतून १ कोटी रुपये खर्चून हे साहित्य खरेदी करण्यात आले असून, त्याचे प्रातिनिधीक स्वरूपात वाटप पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते करण्यात आले.



### १ कोटींच्या संगणक साहित्याचे वाटप

या कार्यक्रमांतर्गत उपविभागीय अधिकारी कार्यालये, तहसील कार्यालये आणि जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभाग, अधिकारी व कर्मचाऱ्यांना हे साहित्य वितरीत करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने ७५ संगणक संच, ५० प्रिंटर्स, २ कलर प्रिंटर्स, ११ स्कॅनर्स, १ झेरॉक्स मशीन आणि ७८ यूपीएस यांसारख्या आधुनिक उपकरणांचा समावेश आहे. या साहित्यामुळे महसूल विभागाच्या दैनंदिन कामकाजात सुसूत्रता येणार असून फाईल्सचा प्रवास अधिक वेगवान आणि पारदर्शक होण्यास मदत होणार आहे.

याप्रसंगी पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी प्रशासकीय कामकाजाला तंत्रज्ञानाची जोड देण्याचे आवाहन केले. लोकांना सुलभ आणि जलद सेवा मिळावी यासाठी प्रशासनाला भौतिक सुविधा व डिजिटल साहित्य मोठ्या प्रमाणावर दिले आहे. आता या उपकरणांच्या सहाय्याने ई-ऑफिस प्रणालीचा वापर करून प्रशासनाने अधिक गतिमानतेने काम करावे, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास खासदार शाहू छत्रपती, खासदार धैर्यशील माने आणि आमदार अशोक माने यांनीही उपस्थित राहून महसूल प्रशासनाच्या या डिजिटल क्रांतीचे कौतुक केले. जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव यांच्यासह जिल्ह्यातील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'गोकुळ' संदर्भातील आज अंतिम सुनावणी

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

▶▶ मंगळवारी दोन्ही बाजूंचे म्हणणे घेतले ऐकून

गोकुळ दूध संघासंदर्भात दिल्लीत सर्वोच्च न्यायालयात आज मंगळवार दि. पाच सुनावणी झाली. या सुनावणीत दोन्हीही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर उद्या बुधवार दि. ६ मे रोजी पुन्हा अंतिम सुनावणी होऊन निकाल दिला जाणार आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.





याबाबत अधिक माहिती अशी, गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीबाबत उच्च न्यायालयाने दिलेले आदेश व महाराष्ट्र सरकारने कायद्यात बदल करून केलेली प्रशासक मंडळाची नियुक्ती, याविरुद्ध गोकुळ दूध संघाचे संचालक व पुंगाव ता. राधानगरी येथील श्री स्वामी समर्थ सहकारी दूध संस्था यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. आज झालेल्या सुनावणी

गोकुळ दूध संघाच्या संचालकांच्यावतीने वरिष्ठ वकील ॲड. अभिषेक मनु सिंघवी, ॲड. आनंद लांडगे व ॲड. भूषण मंडलिक यांनी बाजू मांडली. वरिष्ठ वकील ॲड. मुकुल रोहतगी यांनी श्री स्वामी समर्थ सहकारी दूध संस्थेची बाजू मांडली. श्री महादेव दूध संस्थेच्यावतीने वरिष्ठ वकील ॲड. श्री. तळेकर तर महाराष्ट्र सरकारच्यावतीने ॲड. धर्माधिकारी यांनी काम पाहिले.

# संक्षिप्त...

## मंत्री नितेश राणेंना दिलासा

**मुंबई : हॅलो प्रभात**

मंत्री नितेश राणे यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचने मोठा दिलासा दिला आहे. जिल्हा व सत्र न्यायालयाने सुनावलेल्या एक महिन्याच्या उच्च कारावासाच्या शिक्षेला न्यायालयाने सुनावणीला स्थगिती दिली. याकामी जेष्ठ विधिज्ञ ॲड. संग्राम देसाई यांनी युक्तिवाद केला. त्यांना ॲड. श्रीकृष्ण गणबावले, ॲड. संजना देसाई, ॲड. प्रेरणा सोमाणी, ॲड. अद्वैत वजराटकर यांनी सहकार्य केले.

## चक्रेश्वरवाडीत किरणोत्सव साजरा

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

राधानगरी तालुक्यातील चक्रेश्वरवाडी येथील चक्रेश्वर मंदिरात किरणोत्सव साजरा झाला. गाभाऱ्यातील शिवलिंगावर पडलेल्या सूर्यकिरणांचा अद्भूत क्षण अनुभवण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. हेमाडपंथी वास्तुकला आणि खगोलशास्त्राचा उत्कृष्ट संगम असलेले हे मंदिर अभ्यासकांचेही आकर्षण ठरत आहे. दोन हजार लोकवस्ती असलेल्या या गावात चक्रेश्वर महादेवाचे पुरातन मंदिर आहे. अभ्यासकांच्या मते, या मंदिराचे बांधकाम १४ व्या शतकापूर्वीचे आहे. दरवर्षी १ ते ४ मे दरम्यान येथे किरणोत्सव पाहायला मिळतो.

## सोलापुरात तापमानात घट

**सोलापूर : हॅलो प्रभात**

एप्रिल पाठोपाठ मे महिन्यातही सूर्यनारायण आग ओकत असून, तप्त झळामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. कमाल तापमानात १.४ अंशानी घट होऊनही उन्हाच्या तप्त झळा वाहत असल्याने दुपारच्या वेळी रस्त्यावरील जनजीवन विस्कळीत झाले होते.

# खेळाडू प्रोत्साहन हॅण्डबॉल स्पर्धेत पोदार स्कूल विजेता

**सांगली : हॅलो प्रभात**

सांगली डिस्ट्रिक्ट हॅण्डबॉल असोसिएशनच्या वतीने शिवशक्ती मंडळाच्या क्रीडांगणावर आयोजित जिल्हास्तरीय निमंत्रित मुले-मुली हॅण्डबॉल स्पर्धेत मुलांच्या गटात पोदार इंटरनॅशनल स्कूलने दमदार कामगिरी करत मदनभाऊ युवा मंच सांगली संघाचा २६-१४ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. विजेत्या संघास रोख पारितोषिक व कै. बाबासो भगवान चव्हाण चषक प्रदान करण्यात आला. या स्पर्धेत एकूण नऊ मुलांचे व सहा मुलींचे संघ सहभागी झाले होते. बाद फेरीतून रामानंदनगर, जयंत स्पोर्ट्स ईश्वरपूर, मदनभाऊ युवा मंच आणि पोदार स्कूल यांनी उपांत्य फेरीत प्रवेश



केला. मुलींच्या गटात देशिंग हायस्कूल, ए.बी. पाटील इंग्लिश स्कूल, मदनभाऊ युवा मंच व पोदार स्कूल यांनी उपांत्य फेरी गाठली.

मुलींच्या अंतिम सामन्यात मदनभाऊ युवा मंचने पोदार स्कूलचा १९-१२ असा पराभव करत विजेतेपद मिळवले, तर पोदार स्कूल उपविजेते ठरले. तृतीय क्रमांकासाठी झालेल्या सामन्यात ए.बी. पाटील इंग्लिश स्कूलने देशिंग हायस्कूलवर २२-१८ अशी मात केली. मुलांच्या अंतिम सामन्यात पोदार स्कूलच्या सर्वेश पाटीलने आठ गोल करत उत्कृष्ट कामगिरी केली. प्रज्वल शिर्के व आर्यन कोळेकर यांनी प्रत्येकी चार गोलांची भर घातली. मदनभाऊ युवा मंचकडून गौरव कोळी व निखिल जाधव यांनी प्रत्येकी सहा गोल करत लढत दिली, मात्र पोदारने २६-१४ असा विजय मिळवला.

स्पर्धेचे उद्घाटन अध्यक्षा जयश्रीताई पाटील यांच्या हस्ते झाले. बक्षीस समारंभ उपमहापौर गजानन मगदूम, उपाध्यक्ष प्रा. प्रदीपकुमार चव्हाण, खजिनदार प्रा. हर्षकुमार पाचोरे व सौ. पूजा पाटील यांच्या हस्ते पार पडला. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी स्वप्निल कदम व स्वप्निल मोरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# जिल्हा मध्यवर्ती बँकेची वाटचाल आदर्शवत : आ.जयंतराव पाटील

**सांगली : हॅलो प्रभात**

सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने मागील शंभर वर्षांच्या वाटचालीत विश्वासार्हता, पारदर्शकता आणि आर्थिक शिस्त जपत राज्यातील सहकारी बँकिंग क्षेत्रात आदर्श निर्माण केला आहे, असे गौरवोद्गार आमदार जयंत पाटील यांनी काढले.

जिल्हा बँकेच्या शताब्दी महोत्सवाच्या प्रारंभानिमित्त धनंजय गार्डन येथे आयोजित कृषी व महिला बचत गटांच्या मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी आ. डॉ. विश्वजित कदम, आ. सुधीर गाडगीळ, बँकेचे अध्यक्ष मानसिंगराव नाईक, उपाध्यक्षा जयश्री पाटील, खासदार विशाल पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

आ. पाटील यांनी सांगितले की, बँकेने



कोणत्याही घोटाळ्याचा डाग न लागता सातत्याने प्रगती साधली आहे. राज्यातील सहा प्रमुख जिल्हा बँकांमध्ये सांगली बँकेचा कार्यप्रदर्शन सर्वाधिक उत्तम असून ठेवी सध्या १० हजार कोटींवर पोहोचल्या आहेत. पुढील पाच वर्षांत त्या १५ हजार कोटींच्या टप्प्यावर जातील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

सांगली जिल्ह्यात ७२२ गावांचा समावेश असूनही मर्यादित कार्यक्षेत्रात बँकेने उल्लेखनीय आर्थिक कामगिरी केली आहे. ठेवी, कर्जवाटप आणि व्यवसाय वृद्धीत सातत्य राखत बँकेने इतर जिल्हा बँकांपेक्षा उजवे स्थान मिळवले आहे. बँकेचे अध्यक्ष मानसिंगराव नाईक यांनी प्रास्ताविकात सांगितले की, शेतकऱ्यांसाठी बँक नेहमीच आधारस्तंभ राहिली असून पुढेही त्यांच्यासाठी विविध उपक्रम राबवले जातील. गेल्या पाच वर्षांत पारदर्शक कारभारामुळे बँकेवर जनतेचा विश्वास वाढला आहे.

कार्यक्रमात 'अर्थगाथा-सहकार शताब्दी' कॉफी टेबल पुस्तकाचे प्रकाशन, स्मार्ट कार्ड वितरण व माहितीपटाचे अनावरण करण्यात आले. विविध मान्यवरांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

# 'बंगाल,आसाम'च्या यशाचे पडसाद सांगलीत उमटले

**सांगली : हॅलो प्रभात**

पश्चिम बंगाल, आसाम आणि पुदुच्चेरी येथील विधानसभा निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाने मिळवलेल्या दणदणीत यशाचे पडसाद सांगलीतही उमटले. सांगली विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुधीरदादा गाडगीळ यांच्या जनसंपर्क कार्यालयात भाजप कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी, गुलाल उधळत आणि मिठाई वाटप करत जल्लोष साजरा केला.

'भारत माता की जय' आणि 'नरेंद्र मोदी झिंदाबाद' अशा





भाजपच्या कार्यकर्त्यांचा सांगलीत जल्लोष

घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. कार्यकर्त्यांनी एकमेकांना मिठाई भरवून आनंद व्यक्त केला.

यावेळी आमदार सुधीरदादा गाडगीळ म्हणाले की, हा विजय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर आणि केंद्र सरकारच्या लोककल्याणकारी योजनांवर जनतेने ठेवलेल्या विश्वासाचे प्रतीक आहे. विकास आणि सुशासनाच्या आधारावर भाजपने जनतेची मने जिंकली असून, पुढील काळातही पक्ष सामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी कटिबद्ध राहील, असे त्यांनी सांगितले.या जल्लोषप्रसंगी भाजपा सांगली शहर जिल्हाध्यक्ष प्रकाश ढंग, ज्येष्ठ नेते श्रीकांत शिंदे, अजिंक्य वुमन्स फाउंडेशनच्या संस्थापिका मंजिरीताई गाडगीळ, महापालिका स्थायी समिती सभापती अतुल माने यांच्यासह अनेक पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महावितरण अधिकाऱ्यांचा सीएमडी लोकश चंद्र यांच्या हस्ते गौरव

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

महावितरणची सर्व वर्गवारीतील थकबाकी शून्य करण्याची उल्लेखनीय कामगिरी पार पाडणाऱ्या कोल्हापूर परिमंडलातील अकरा उपविभागीय अधिकाऱ्यांचा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

राज्यात शून्य थकबाकी साध्य करणारे एकूण अकरा उपविभाग असून हे सर्व उपविभाग कोल्हापूर परिमंडलातील आहेत. यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील नऊ आणि सांगली जिल्ह्यातील दोन उपविभागांचा समावेश आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील महाराणी ताराराणी सभागृहात आयोजित आढावा बैठकीत हा सन्मान सोहळा पार पडला.

यावेळी मार्गदर्शन करताना लोकेश चंद्र यांनी कोल्हापूर परिमंडलाचे ग्राहक सेवा, देखभाल-दुरुस्ती, थकबाकी





वसुली आणि स्मार्ट मीटर कार्यात उत्कृष्ट कामगिरी असल्याचे नमूद केले. पावसाळ्यापूर्वीची कामे पूर्ण करणे, सुरक्षा साधनांचा वापर, अपघात शून्य करण्यासाठी प्रयत्न आणि ग्राहकांना वेळेत सेवा देण्यावर भर देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

शून्य थकबाकी करणाऱ्या उपविभागांमध्ये नेसरी, आजरा, शिरोळ, गगनबावडा, कदमवाडी, कळे, कोडोली, पन्हाळा, परिते, सावळज आणि खानापूर यांचा समावेश आहे.

या कार्यक्रमास संचालक (संचलन) सचिन तालेवार, प्रादेशिक संचालक सुनिल काकडे, मुख्य अभियंता स्वप्निल काटकर यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# मनपा कर्जरोख्यांतून उभारणार १०० कोटी

## १६१६ कोटींचा अर्थसंकल्प अंतिम

**सांगली : हॅलो प्रभात**

सांगली महापालिकेचा २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा १,६१६ कोटी ६२ लाख रुपयांचा अर्थसंकल्प महापौर धीरज सूर्यवंशी यांनी अंतिम केला आहे.



स्थायी समितीने सादर केलेल्या प्रारूप अर्थसंकल्पात तब्बल ५५१ कोटींची वाढ करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, पहिल्यांदाच कर्जरोख्यांच्या (बॉण्ड्स) माध्यमातून १०० कोटी रुपये उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महापौर सूर्यवंशी यांनी सांगितले की, या निधीचा वापर महापालिकेच्या उत्पन्नवाढीच्या योजनांसाठी केला जाणार आहे. तसेच केंद्र व राज्य शासनाकडून २०० कोटींच्या विशेष निधीसाठी पाठपुरावा करण्यात येणार आहे. नियमित कर भरणाऱ्या नागरिकांसाठी ५० ते ६० टक्यांपर्यंत सवलत देण्याची विशेष योजना अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आली आहे. अर्थसंकल्पात शहर विकास, पायाभूत सुविधा, क्रीडा, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रासाठी मोठ्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. शिव-शंभू सृष्टीसाठी १० कोटी, महिला व बालकल्याणासाठी १० कोटी, महापालिका शाळांसाठी ५.१० कोटी, तसेच स्टेडियम विकासासाठी १६.२५ कोटी रुपयांची तरतूद आहे.

महापौरांनी हा अर्थसंकल्प 'सांगली, मिरज आणि कुपवाड शहरांच्या उज्ज्वल भविष्याचा रोडमॅप' असल्याचे सांगितले. थकबाकी वसुलीसाठी समिती व शहर विकास सल्लागार समिती स्थापन करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.





# बदलते राजकारण, वाढती भीती आणि 'सत्तेचा ओढा'



देशातील सध्याच्या राजकीय घडामोडींवर बारकाईने नजर टाकल्यास एक स्पष्ट प्रवाह दिसून येतो, सत्तेच्या केंद्रीकरणाचा आणि विरोधकांच्या क्रमाक्रमाने होत असलेल्या कमकुवतपणाचा. राज्यस्तरावर मजबूत मानले जाणारे अनेक प्रादेशिक पक्ष आता अस्तित्वाच्या लढाईत अडकलेले दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर आगामी निवडणुकांकडे पाहताना एक वेगळेच चित्र समोर येत आहे. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या दीर्घकाळ चाललेल्या सत्तेला आव्हान निर्माण झाले आणि त्यात भाजपला यश मिळाले. तमिळनाडूत एम. के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील राजकारणाला पर्याय म्हणून अभिनेता विजय यांच्या पक्षाने उभारलेली ताकदही लक्षणीय ठरली. या दोन राज्यांतील घडामोडींनी प्रादेशिक पक्षांची पकड सैल होत असल्याचे संकेत दिले आहेत. या बदलांचा थेट परिणाम महाराष्ट्राच्या राजकारणावर होणार हे उघड आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजपने मिळवलेले यश हे त्याचेच द्योतक आहे. विरोधक म्हणून ओळखले जाणारे काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव गट) हे प्रभावी पर्याय म्हणून समोर येऊ शकले नाहीत. उलट, सत्ताधारी महायुतीमधील घटक पक्षांमध्येच परस्पर संघर्ष दिसून आला. अजितदादा पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटांमधील स्पर्धा, तसेच प्रचारादरम्यान झालेले आरोप-प्रत्यारोप यामुळे सत्ताधारी युतीतील अंतर्गत तणाव उघड झाला. या सगळ्यात अचानक घडलेली अजितदादा पवार यांच्या निधनाची घटना ही राजकीय समीकरणांना मोठा धक्का देणारी ठरली. या घटनेभोवती निर्माण झालेल्या शंकांनी राजकारणात आणखी अस्थिरता निर्माण केली. दरम्यान, प्रादेशिक पक्षांचे एकत्रीकरण होण्याची शक्यता निर्माण झाली होती. शरद पवार आणि त्यांच्या पुतण्यामधील सलोखा वाढत असल्याच्या चर्चा होत्या. अशा एकीमुळे महाविकास आघाडीला पुन्हा बळ मिळण्याची शक्यता होती. मात्र अनपेक्षित घटनांमुळे हे प्रयत्न अपूर्णच राहिले. गेल्या काही वर्षांत भाजपने केवळ निवडणूक लढवण्यापुरते राजकारण मर्यादित ठेवले नाही, तर व्यापक पातळीवर विचारधारात्मक आणि संघटनात्मक रणनीती राबवली. 'सेक्युलर' या संकल्पनेला वेगळ्या अर्थाने मांडत, बहुसंख्यांक एकजुटीचा संदेश प्रभावीपणे पोहोचवण्यात आला. 'लव्ह जिहाद', 'धर्मांतर', 'दहशतवाद' यांसारख्या मुद्द्यांभोवती वातावरण तापवले गेले आणि त्याचा राजकीय फायदा घेतला गेला. यासोबतच, केंद्रीय यंत्रणांचा वापर, निधी वितरणातील असमानता, आणि 'डबल इंजिन सरकार'चा प्रचार या माध्यमातून मतदारांवर प्रभाव टाकण्यात आला. विकासकामांची गती, थेट आर्थिक लाभ योजना आणि राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा यामुळे विशेषतः तरुण आणि महिला मतदारांमध्ये भाजपबद्दल आकर्षण वाढले आहे. अरविंद केजरीवाल आणि मनीष सिसोदिया यांच्या अटकेसारख्या घटनांनी विरोधी नेत्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले आहे. या पार्श्वभूमीवर, अनेक नेते सत्ताधारी पक्षाशी सौम्य भूमिका घेताना दिसत आहेत. याचा थेट परिणाम असा होऊ शकतो की, ज्यांना स्वतःच्या निवडणुकीबाबत शाश्वती वाटत नाही किंवा मतदारसंघातील वातावरण बदलल्याची जाणीव होते, ते नेते सत्ताधारी पक्षात प्रवेश करण्याचा मार्ग स्वीकारतील. 'सत्तेत सुरक्षितता' ही भावना अधिक बळकट होत चालली आहे. राजकारणात विचारधारा, निष्ठा आणि तत्त्वे यापेक्षा सत्तेची समीकरणे आणि अस्तित्वाची लढाई अधिक महत्त्वाची ठरत आहे. अशा परिस्थितीत, लोकशाहीतील सशक्त विरोधकांची भूमिका कमकुवत होत जाणे ही चिंतेची बाब आहे. आगामी काळात महाराष्ट्रातील राजकीय घडामोडी या पार्श्वभूमीवर अधिकच रोचक आणि कदाचित अस्थिर ठरणार आहेत.

# प्रभावी समाजसुधारक : राजर्षी छत्रपती शाहू महाराज



## ६ मे : राजर्षी छत्रपती शाहू महाराज पुण्यतिथी

**हॅलो प्रभात**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज अर्थात चौथे शाहू (जून २६, इ. स. १८७४ - मे ६, इ. स. १९२२) हे कोल्हापूर राज्याचे इसवी सन १८८४-१९२२ सालांदरम्यान छत्रपती होते. तसेच ते अत्यंत प्रभावी समाजसुधारक आणि सुधारणावादीही होते.

### जीवन परिचय

शाहू महाराजांचा जन्म जून २६, इ.स. १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात झाला. त्यांचे नाव यशवंत, त्यांच्या वडिलांचे जयसिंगराव (आप्पासाहेब), आईचे नाव राधाबाई होते. कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी १७ मार्च, इ.स. १८८४ रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले, व शाहू हे नाव ठेवले. एप्रिल २, इ.स. १८९४ रोजी त्यांचा राज्यारोहण समारंभ झाला. राज्याभिषेक झाल्यानंतर इ.स. १९२२ सालापर्यंत म्हणजे २८ वर्षे ते कोल्हापूर संस्थानाचे राजे होते. मुंबई येथे मे ६, इ. स. १९२२ रोजी त्यांचे निधन झाले.



### जन्मदिवस

शाहू महाराजांचा २६ जून हा जन्म दिवस 'सामाजिक न्याय दिवस' म्हणून पाळला जातो. त्यादिवशी कोल्हापूरमध्ये व अन्य काही ठिकाणी बरेच सार्वजनिक कार्यक्रम होतात.

### शैक्षणिक तसेच सामाजिक कार्य

शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी इ.स. १९१९ साली सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची पद्धत बंद केली. जातिभेद दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. इ.स. १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. बहुजन समाजाला राजकीय निर्णयप्रक्रियेत सामावून घेण्यासाठी संदर्भ हवा त्यांनी इ.स. १९१६ साली निपाणी येथे 'डेक्कन रयत असोसिएशन' ही संस्था स्थापली. वेदोक्त मंत्र म्हणण्याच्या अधिकारावरून झालेला वेदोक्त प्रकरण शाहू महाराजांच्याच काळात झाला. 'शाहू छत्रपती स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल', शाहुपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांची सहकारी संस्था, शेतकी तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी 'किंग एडवर्ड अ‍ॅग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट' इत्यादी संस्था कोल्हापुरात स्थापण्यात त्यांचा प्रमुख वाटा होता. राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्जे उपलब्ध करून देणे अशा उपक्रमांतूनही त्यांनी कृषिविकासाकडे लक्ष पुरवले. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या शिक्षणासाठी, तसेच मूकनायक वृत्तपत्रासाठीही सहकार्य केले होते. त्यांनी चित्रकार आबालाल रहिमान यांच्यासारख्या कलावंतांना राजाश्रय देऊन प्रोत्साहन दिले. शाहू महाराजांना 'राजर्षी' ही उपाधी कानपूरच्या कुर्मी क्षत्रिय समाजाने दिली. शाहू महाराजांचे नाव घेतले की दुर्दैवाने आजही काही लोकांच्या कपाळाला आठ्या पडतात. तर काही लोकांना शाहूंच्या विचाराशी काही देणे-घेणे नसते पण उठता-बसता शाहूंचे नाव घ्यायला आवडते. तर काहींना शाहूंचे विचार केवळ आरक्षणाच्या अनुषंगाने महान वाटतात, त्या लोकांना शाहू म्हणजे केवळ आरक्षणाचे उद्गाते वाटतात. काही लोकांना शाहू फक्त आपल्या जातीच्या भूषणापायी प्रिय वाटतात ! तर काही लोकांना राजकीय सोयीपोटी शाहू जवळचे वाटतात. संपूर्ण शाहू महाराज खूप कमी लोकांच्या पचनी पडतात ! शाहूंची पूर्ण माहिती नसतानाही त्यांची भलावण करणारे आणि खाजगीत त्यांच्या नावे बोटे मोडणारे असे दोन्ही प्रकारचे लोक समाजात मोठ्या प्रमाणात आढळतात. कोणत्याही अभिनिवेशाशिवाय मनापासून संपूर्ण शाहू ज्यांच्या मनाला पटले आहेत असे लोक मात्र खूप कमी आढळतात! आज शाहूंच्या नावाने आपली दुकानदारी चालवणाऱ्या लोकाना त्यांचा इतिहास आणि त्यांची विचारधारा कितपत माहित असेल हा संशोधनाचा विषय व्हावा, अशी परिस्थिती आहे.

तरीदेखील आजही अनेकांच्या सामाजिक जाणिवांचे बावनकशी प्रेरणास्त्रोत अशीच शाहूंची आजची ओळख आहे. समतेचे अन् बंधुतेचे कागदी गोडवे आजही सर्वत्र गायिले जातात परंतु खरे कार्य करताना नाके मुरडली जातात हा अनुभव आहे, त्यामुळेच शाहूंच्या जन्माला १४२ वर्षे उलटूनही त्यांच्या विचारानुसार समग्र आयुष्यभर तंतोतंत वाटचाल करणारा नेता आजच्या घडीला अस्तित्वात नाही.

स्वातंत्र्यापूर्वी कैक वर्षे आधी समता, बंधुता, धर्म-निरपेक्षता, सर्व घटकांना विकासाची समान संधी ही तत्त्वे राजर्षी शाहू महाराजांनी करवीर संस्थानात अमलात आणली. म्हणूनच त्यांचा देशभरात महाराजांचे महाराज' असा गौरव होतो. शाहू महाराजांना राजर्षी ही उपाधी कानपूरच्या कुर्मी क्षत्रिय समाजाने दिली. राजर्षी शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव होते. त्यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथील घाटगे घराण्यातला. आज शाहूंची पुण्यतिथी. महाराजानी सुमारे २८ वर्षे राज्यकारभार केला. राजर्षी शाहू राजांना बहुजनांच्या शिक्षणाविषयी फार तळमळ होती. कारण माणसाला पशुत्वापासून मनुष्यत्व मिळवून देणारे एक प्रभावी अस्त्र म्हणजे शिक्षण होय. त्यामुळे शिक्षणाशिवाय आपला उध्दार होणार नाही. हे राजर्षींनी ओळखले होते. म्हणून कोल्हापूर संस्थानात सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा केला. एवढेच नाही तर ५०० ते १००० लोकवस्तीच्या गावांमध्ये शाळांची निर्मित केली. आणि एवढ्यावरही महाराज थांबले नाहीत तर जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवणार नाहीत त्या पालकांना प्रतिमहिना १ रू. दंड आकरण्याची कायदेशीर तरतूद केली. त्यांनी आपल्या राज्यात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले.




अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दुष्ट पद्धत १९१९ मध्ये बंद केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला चालवावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, प्रत्यक्ष व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या, तंत्रे व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा असेही उपक्रम त्यांनी राबवले. शाहू राजे हे त्यांच्या कर्तृत्वामुळे नावाप्रमाणेच यशवंत राहिले.

छत्रपती शिवरायांच्या विचारांचा व कार्याचा वारसा मोठ्या समर्थपणे घेऊन जाण्याचे कार्य करणारा एक महान मानवतावादी राजा म्हणून राजर्षी शाहू महारजानी आपली ओळख निर्माण केली. या व्यापक दूरदृष्टीच्या राजाने त्याकाळी राजेशाही असतांनासुध्दा सामाजिक बंधूभाव, समता, दलित आणि उपेक्षित बांधवांचा उध्दार, शिक्षण, शेती, उद्योगधंदे, कला, क्रीडा व आरोग्य इत्यादी महत्वपूर्ण क्षेत्रामध्ये आजच्या लोकशाहीतील शासनालाही करणे शक्य होत नाही. असे अद्वितीय स्वरुपाचे कार्य केले.

मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणावयाचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे. हा व्यापक दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून या निधड्या छातीच्या समाजसुधारकाने ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव राहतील अशी घोषणा केली. नुसती घोषणा करुन थांबणारे ते राजे नव्हते तर त्वरीत अंमलबजावणी करुन संबंधीत अधिकाऱ्याकडून अहवाल मागविले. शाहूंच्या या निर्णयाला तेंव्हा सामाजिक कार्यकर्ते म्हणवणाऱ्या अनेक उच्चवर्णीय पुढाऱ्यांनी विरोध केला. राजर्षींवर अनेक प्रकारचे आरोप केले. त्यांनी अस्पृश्यांना राखीव जागांची तरतूद करून सरकारी नोकऱ्या मिळवून दिल्या. शाळा, दवाखाने, पाणवठे, सार्वजनिक विहिरी, सार्वजनिक इमारती इत्यादी ठिकाणी (तत्कालीन) अस्पृश्यांना समानतेने वागवावे असा आदेश त्यांनी कोल्हापूर संस्थानात काढला. १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. तसेच त्यांनी देवदासी प्रथा बंद करण्यासाठीही कायद्याची निर्मिती केली. बहुजन समाजाला राजकीय निर्णयप्रक्रियेत सामावून घेण्यासाठी त्यांनी इ. स. १९१६ साली निपाणी येथे 'डेक्कन रयत असोसिएशन' ही संस्था स्थापली. त्यावेळेस धर्मव्यवस्थेने स्त्रियांना अतिशय उपेक्षित ठेवले. त्यांचे हक्क, अधिकार, नाकारले, स्त्री म्हणजे केवळ चूल व मूल या पुरतीच मर्यादित ठेवली त्याकाळी धर्माच्या नावाखाली देवांना मुले-मुली वाहण्याची अतिशय विचित्र पद्धत आपल्या देशात चालू होती. परंतु राजांनी आपल्या संस्थानात जोगत्या-मुरळी प्रतिबंधक कायदा करुन ही पद्धत बंद पाडली. जातीभेदाचे प्रस्त नष्ट व्हावे म्हणून आपल्या संस्थानात आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशर मान्यता दिली. तसा कायदा पारित केला आणि याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना आपल्या चूलत बहीणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले. एवढेच नव्हे तर संस्थानात जवळजवळ १०० मराठा धनगर विवाह घडवून आणले. अशा अनेक कार्याच्या माध्यमातून त्यांनी स्त्रियांना सन्मानाची वागणूक व दर्जा मिळवून दिला. परंतु आज एकविसाव्या शतकामध्ये आणि लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये मात्र स्त्रिभ्रूणहत्या, हूंडाबळी सारख्या अनेक माध्यमातून स्त्रियांचा मोठ्या प्रमाणात बळी दिला जात आहे. आज स्त्रीयांना या संकटातून बाहेर काढावयाचे असेल तर राजर्षी शाहूंचा स्त्रीविषयक व्यापक दृष्टीकोनच आपण स्विकारणे ही काळाची गरज आहे.

### राजर्षी शाहू राजे फक्त जयंती व पुण्यतिथी पुरते मर्यादित

आज शाहू राजांच्या जयंत्या-पुण्यतिथ्या सर्वत्र साजऱ्या केल्या जातात. परंतु केवळ एवढ्याने त्यांच्या विचार व कार्याचे चिज होणार नाही. शाहूंचा लढा हा समतेसाठी होता. आत्मसन्मासाठी होता. वर्णवर्चस्वाच्या अहंकारी प्रवृत्ती विरुध्द होता. आज शाहू राजांच्या नंतर मात्र त्यांचाच जयजयकार करणारे त्यांच्या नावाने सत्ता भोगणारे राज्यकर्ते गरीब प्रजेला छळत आहेत. भ्रष्टाचार, गुंडगीरी या प्रवृत्ती फोफावल्या आहेत. शाहू राजे फक्त जयंती व पुण्यतिथीपुरते मर्यादित केले गेले आहेत. त्यांचा वारसा, विचार, कार्य आपण विसरलो आहोत.

राजर्षी शाहूंनी प्रतिकूल परिस्थितीत आपल्या संस्थानात जनहितार्थ अनेक कायदे केले. प्रसंगी टिका, अपमान, बदनामी यांची पर्वा केली नाही. आजचे राज्यकर्ते शाहूंच्या नावाने राजकारण करतात. मात्र त्यांचा विचार जपतांना घाबरतात. ही दुर्दैवी बाब आहे..!

### छत्रपती शाहूंनी मुंबईत 'पन्हाळा लॉज' या ठिकाणी घेतला अखेरचा श्वास...

**राजर्षी शाहू महाराजांचे मुंबईत निधन झाले त्या घटनेला आज ६ मे २०२५ रोजी १०३ वर्षे होत आहेत. मात्र शाहू महाराजांनी शेवटचा श्वास जिथे घेतला. ते ठिकाण म्हणजे 'पन्हाळा लॉज'. मात्र, हे ठिकाण मुंबईत नेमकं कुठे आहे? याची कुणालाही माहिती नव्हती. इतकी वर्ष हे ठिकाण दुर्लक्षित राहिलं. आता महाराष्ट्र राज्य कुस्ती मल्लविद्या महासंघाचे मुख्य प्रवक्ते पैलवान संग्राम कांबळे यांनी गेली काही वर्षे अथक संशोधन करुन जिथे पन्हाळा लॉज होता. त्या गिरगाव, खेतवाडीमधील गल्ली क्रमांक १३ इथे स्वतः जाऊन या जागेचा शोध घेतलाय. तिथे राहणाऱ्या अनेक जुन्या वयोवृध्द माणसांना त्यांनी याबाबत विचारले. काही जुन्या काळातील वयोवृद्ध मंडळींनी पन्हाळा लॉजच्या जुजबी आठवणी सांगितल्या आहेत. ही जागा अनेकांनी विकत घेतली. नवीन इमारती बांधल्या, पाडल्या गेल्या. आज इथे मोठी इमारत उभी आहे. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेतील पुरातत्व विभागामध्ये जाऊन त्या जागेची पक्की खात्री करून तसेच त्या जागेवर पूर्वी काय होतं याची शहानिशा करून त्यांनी हे ठिकाण शोधले असून बृहन्मुंबई पुरातत्व विभागाकडे छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृती जपण्यासाठी महानगरपालिकेतर्फे नील फलक तसेच त्या रोडला छत्रपती राजश्री शाहू महाराजांचं नाव देण्याचीही मागणी करण्यात आली आहे.**

## वीज प्रश्नांवर नातेपुते ग्रामस्थ आक्रमक; महावितरणला निवेदन

**नातेपुते : हॅलो प्रभात**



नातेपुते शहर व परिसरातील वीज समस्यांबाबत ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेत महावितरण प्रशासनाला निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. 'समस्त ग्रामस्थ नातेपुते'च्या वतीने उपकार्यकारी अभियंता सुभाष टोणपे यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात शेतकऱ्यांसाठी दिवसा सलग ८ ते १० तास वीजपुरवठा, वारंवार खंडित होणारा पुरवठा सुरळीत करणे,

चुकीची वीजबिले दुरुस्तीसाठी विशेष शिबिर घेणे, टिळक चौक व माऊली मंदिर परिसरातील धोकादायक उघड्या तारा हटविणे, बोराटे वस्ती व राऊत वस्ती येथे नवीन विद्युत रोहित्र सुरू करणे तसेच गंजलेले वीज खांब बदलण्याची मागणी करण्यात आली आहे.

पश्चिम भागातील अनेक गावांतील पिके पाण्याअभावी करपत असल्याने प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला.

यावेळी अक्षय भांड, अमोल उराडे, किशोर पलंगे, गणेश पागे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

## एफआरएनडी अ‍ॅपमुळे महेश्वरीला मिळाला नवा आधार

**पुणे : हॅलो प्रभात**

डिजिटल युगात अर्थपूर्ण मानवी नातेसंबंध दुर्मिळ होत असताना चेन्नईतील महेश्वरी या तरुणीला एफआरएनडी अ‍ॅपच्या माध्यमातून भावनिक आधार आणि आत्मअभिव्यक्तीचे व्यासपीठ मिळाले आहे. ३५ वर्षीय महेश्वरी या टेलर असून सोशल मीडियावर सक्रिय आहेत. घटस्फोटानंतर आलेल्या एकटेपणा, ताण आणि मानसिक अस्वस्थतेच्या काळात एका मैत्रिणीच्या सल्ल्याने त्यांनी एफआरएनडी अ‍ॅपचा वापर सुरू केला. सुरुवातीला संवादासाठी वापरलेले हे व्यासपीठ पुढे त्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवणारे ठरले. महेश्वरी यांनी या माध्यमातून केवळ नवे संवादच साधले नाहीत, तर इतरांना प्रेरणा देण्याचे कामही सुरू केले. अर्थपूर्ण संभाषण, समजूतदारपणा आणि मुक्तपणे व्यक्त होण्याची संधी यामुळे त्यांना या व्यासपीठावर सुरक्षित आणि आत्मीय वातावरण मिळाल्याची भावना व्यक्त केली.

## ब्लॅक डॉग व्हिस्कीचे नवीन पॅकेजिंग सादर

**पुणे: हॅलो प्रभात**

ब्लॅक डॉग स्कॉच व्हिस्कीने आपल्या ब्रँडचे नवीन आणि आधुनिक पॅकेजिंग सादर केले आहे. १४० वर्षांहून अधिक परंपरा जपत सादर करण्यात आलेल्या या नव्या डिझाइनमध्ये प्रीमियम लूक आणि आधुनिकतेचा संगम साधण्यात आला आहे. नवीन पॅकेजिंगमध्ये सूक्ष्म डिझाइन, प्रीमियम फिनिश आणि स्पष्ट मांडणीद्वारे ब्रँडची वैशिष्ट्यपूर्ण ओळख अधोरेखित करण्यात आली आहे.

## महिलांच्या कर्करोग प्रतिबंधासाठी महाराष्ट्रात नवा उपक्रम

**मुंबई : हॅलो प्रभात**

एमओसी कॅन्सर केअर फाउंडेशन आणि असोसिएशन ऑफ महाराष्ट्र ऑब्स्टेट्रिक्स अँड गायनॅकॉलॉजी सोसायटीज यांनी महाराष्ट्रातील महिलांसाठी संरचित कर्करोग प्रतिबंध कार्यक्रम सुरू केला आहे. तपासणीपासून उपचारापर्यंतचा संपूर्ण आरोग्य प्रवास समाविष्ट करणारा हा राज्यातील पहिला डॉक्टरांच्या नेतृत्वाखालील उपक्रम मानला जात आहे.

राज्यात दरवर्षी १.२१ लाखांहून अधिक नवीन कर्करोग रुग्ण आढळतात. त्यापैकी ३० टक्क्यांहून अधिक रुग्ण स्तन आणि गर्भाशयमुखाच्या कर्करोगाचे असतात. लवकर निदान झाल्यास हे कर्करोग मोठ्या प्रमाणात बरे होऊ शकतात.

या कार्यक्रमांतर्गत जनजागृती, तपासणी, एचपीव्ही लसीकरण आणि उपचार सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. ९ ते १८ वयोगटातील मुलींना सरकारी आरोग्य केंद्रांवर मोफत, तर १८ ते २६ वयोगटातील महिलांना अनुदानित दरात एचपीव्ही लस दिली जाणार आहे.

कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू झाली असून मुंबईतील नायर रुग्णालयातील नर्सिंग विद्यार्थिनींसाठी लसीकरण मोहीम सुरू करण्यात आली आहे.

## युनियन म्युच्युअल फंड तर्फे कोल्हापूरमध्ये नवीन शाखा सुरू

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

युनियन बँक ऑफ इंडियाच्या प्रायोजकत्वाखाली आणि दाईइची लाइफ ग्रुप, इन्क.च्या सहकार्याने कार्यरत असलेल्या युनियन म्युच्युअल फंडने कोल्हापूर येथे नवीन शाखा सुरू केल्याची घोषणा केली आहे. 'विकसित भारत'च्या उद्दिष्टाला हातभार लावणे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. भांडवली बाजारातील संधी आणि गुंतवणूकदारांचा पोर्टफोलिओ यात दुवा निर्माण करत, दीर्घकालीन गुंतवणुकीद्वारे बाजारातून निर्माण होणारी मूल्यवृद्धी प्रत्यक्ष संपत्ती निर्मितीत रूपांतरित करण्याचा युनियन एमएफचा प्रयत्न आहे. चीफ मार्केटिंग ऑफिसर सौरभ जैन यांच्या हस्ते, वरिष्ठ प्रादेशिक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत या नव्या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.

## हर्षदीप हॉर्टिकोची दमदार कामगिरी

**मुंबई : हॅलो प्रभात**



कुंड्या, प्लांटर्स, बागेतील उपकरणे आणि बाह्य फर्निचरच्या निर्मिती आणि निर्यातीत विशेष नैपुण्य असलेल्या हर्षदीप हॉर्टिको लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या दुसऱ्या सहामाहीचे अलेखापरीक्षित आर्थिक निकाल जाहीर केले आहेत. हर्षदीप हॉर्टिको लिमिटेडने आर्थिक वर्ष च्या दुसऱ्या सहामाहीत उत्कृष्ट कामगिरीची नोंद केली आहे. कंपनीचा महसूल ३६.०७ कोटी रुपयांवर पोहोचला असून, मागील वर्षाच्या ३१.४५ कोटींच्या तुलनेत यात १५ टक्क्यांची वार्षिक वाढ दिसून आली आहे. नफ्याच्या बाबतीतही कंपनीने मोठी झेप घेतली असून, करपूर्व नफा २५ टक्क्यांच्या वाढीसह ६.८२ कोटी रुपये इतका नोंदवला गेला आहे.

## कर्व्ह इव्ही सिरीजएक्स लॉन्च

**मुंबई : हॅलो प्रभात**



टाटा.इव्ही या भारतातील सर्वात मोठ्या चारचाकी इव्ही उत्पादकाने नवीन कर्व्ह.इव्ही सिरीजएक्स लॉन्च केली आहे, ज्यामध्ये दोन लांब पल्ल्याच्या, अनेक फीचर्सने समृद्ध आणि प्रीमियम गाड्या आहेत. आत्मविश्वासाने दूरचा पल्ला गाठू शकेल अशा एसयूव्हीची अपेक्षा करणाऱ्या ग्राहकांसाठी त्या तयार करण्यात आल्या आहेत. मुंबईतील एक्स-शोरूम किंमतीनुसार, अ‍ॅकम्प्लिश्ड एक्स५५ या प्रकाराची किंमत १६.९९ लाख रुपये आहे. एम्पावर्ड एक्स५५ हा प्रकार १९.१९ लाख रुपयांमध्ये उपलब्ध असून, एम्पावर्ड एक्स५५ डार्क या व्हेरिएंटची किंमत १९.४९ लाख आहे.

हॅलो प्रभात
नवे विचार...नवी सुरुवात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात, कार्यालय : एस.९४६, GF-7, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२(महाराष्ट्र)** येथून प्रसिद्ध केले.

■ The imprint line should be printed legibly as Printed by Published by GANESH BANDA PATIL on behalf of GANESH BANDA PATIL, printed at and published at 946, GF-7, Gulmarg Appartment, Sarnaik Colony, Shivaji Peth, **kolhapur** **- Editor GANESH BANDA PATIL.**

■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३० ■ **सांगली कार्यालय** : कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली.४१६४१६

■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)

■ व्यवस्थापकीय संपादिका : माहेश्वरी घोरपडे ■ संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर ■ संपर्क : 9011889001

# स्टेनली जॉर्डन आणि केनवुड डेनार्ड यांचे लाईव्ह परफॉर्मन्स



**पुणे : हॅलो प्रभात** : भारतामधील खास अनुभव देणाऱ्या ठिकाणांपैकी एक असलेले विंडमिल्स क्राफ्टवर्क्स हे संगीत, आंतरराष्ट्रीय खाद्यसंस्कृती, क्राफ्ट बिअर आणि सुंदर आर्किटेक्चर यांचा संगम घडवून अविस्मरणीय अनुभव देण्यासाठी ओळखले जाते. या मे महिन्यात, टोटल एन्व्हायर्नमेंट म्युझिक फाउंडेशनतर्फे चार वेळा ग्रॅमी पुरस्कारासाठी नामांकन मिळवलेले जॅझ गिटार वादक स्टेनली जॉर्डन यांचा खास लाइव्ह परफॉर्मन्स आयोजित करण्यात आला आहे. त्यांच्यासोबत प्रसिद्ध दमदार ड्रमर केनवुड डेनार्ड देखील असतील. हा कार्यक्रम 15 मे 2026 रोजी विंडमिल्स क्राफ्टवर्क्स, हैदराबाद येथे होईल. त्यानंतर 16 आणि 17 मे 2026 रोजी बेंगळुरूमध्येही हा कार्यक्रम सादर केला जाईल. संगीतप्रेमींना या कार्यक्रमात सुंदर ताल, सहज सादरीकरण (इम्प्रोव्हायझेशन), जॅझ संगीताचा आनंद घेता येईल. दोन दिग्गज संगीतकारांमधील सुरेल संवादही अनुभवायला मिळेल. हा कार्यक्रम खास ऐकण्यासाठी तयार केलेल्या वातावरणात आयोजित करण्यात आला आहे. स्टेनली जॉर्डन यांनी त्यांच्या दोन हातांनी वाजवण्याच्या 'टच टेक्निक' या अनोख्या शैलीमुळे जॅझ संगीताला नवीन ओळख दिली आहे. ते एक प्रतिभावान कलाकार असून, या टेक्निकच्या मदतीने ते एकाच वेळी सूर, ताल आणि हार्मनी सादर करतात. त्यामुळे त्यांनी जगभरात मोठी ओळख आणि चाहतावर्ग निर्माण केला आहे. डिझी गिलेस्पी, क्विन्सी जोन्स यांसारख्या प्रसिद्ध कलाकारांसोबत केलेल्या कामामुळे त्यांची संगीत कारकीर्द अधिक मजबूत झाली आहे.

# 'बारामती'मध्ये सुनेत्रा पवारांचा विक्रमी मताने विजय

**बारामती : हॅलो प्रभात**

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुनेत्रा पवार यांनी ऐतिहासिक विजय नोंदवत देशाच्या राजकीय पटलावर नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.

झालेल्या पोटनिवडणुकीत त्यांनी विरोधी पक्षातील उमेदवारास कात्रजचा घाट दाखवत तब्बल २ लाख १८ हजार ९३० मतांच्या प्रचंड आघाडीसह विजय मिळवत देशातील सर्वाधिक मताधिक्य मिळवणाऱ्या आमदाराचा मान पटकावला आहे.मिळालेल्या विजयामुळे बारामती शहरासह तालुक्यात देखील असलेले वर्चस्व हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचेच असल्याचे मिळालेल्या विजयामुळे सिद्ध झाले आहे. या विजयासह त्यांनी उत्तर प्रदेशातील आमदार सुनील शर्मा यांचा २०२२ मधील २ लाख १४ हजार ८३५ मतांच्या आघाडीचा विक्रम मोडीत काढला. विशेष म्हणजे, हा विक्रम मोडण्यासाठी सुनेत्रा पवार यांना एकूण मतदानांपैकी सुमारे ५५ टक्के मतांची आवश्यकता होती, जी त्यांनी सहज पार केली. बारामती हा पारंपरिकदृष्ट्या पवार कुटुंबाचा बालेकिल्ला मानला जातो. यापूर्वी या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व अजित पवार यांनी अनेक वेळा केले आहे. मात्र, यंदाच्या पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार यांनी केवळ विजयच मिळवला नाही, तर मताधिक्याचा नवा उच्चांक गाठत मतदारांचा प्रचंड विश्वास संपादन केला.



- तब्बल २ लाख १८ हजारांहून अधिक मताधिक्य
- देशातील सर्वाधिक मताधिक्याचा विक्रम

# आ. रोहित पवारांकडून प्रकल्पाचे कौतुक

## महिलांच्या बीज भांडारालाही दिली भेट : क्षारपड मुक्ती प्रकल्प दिशादर्शक : आ. रोहित पवार

**शिरोळ : हॅलो प्रभात**

दत्त उद्योग समूहाचे प्रमुख उद्यानपंडित गणपतराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेले क्षारपड मुक्त जमीन प्रकल्प आणि महिला सेंद्रिय बीज भांडार उपक्रम हे शेतकऱ्यांसाठी दिशादर्शक असल्याचे प्रतिपादन आमदार रोहित पवार यांनी केले. बारामतीचे कृषी भूषण राजेंद्र पवार यांच्यासह आमदार रोहित पवार यांनी शिरोळ येथील श्री दत्त सहकारी साखर कारखाना कार्यस्थळाला भेट देऊन विविध उपक्रमांची पाहणी केली. यावेळी कवठेगुलंद येथे राबविण्यात आलेल्या क्षारपड जमीन मुक्ती प्रकल्पाची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या प्रकल्पांतर्गत सच्छिद्र निचरा प्रणालीद्वारे ७५० एकर जमीन क्षारमुक्त करण्यात आली असून एकूण २३ गावांमध्ये १० हजार एकर क्षेत्रावर प्रकल्प राबविण्यात येत आहे. २१० किमी मुख्य पाईपलाईन व ४,५०० एकर अंतर्गत पाईपलाईनचे काम पूर्ण झाले आहे. पूर्वी निष्प्रभ असलेल्या जमिनीत आता एकरी ६० ते ७० टन ऊस उत्पादन मिळत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. आमदार पवार यांनी या उपक्रमाचे कौतुक करत हा प्रयोग राज्यातील शेतकऱ्यांसाठी दिशादर्शक ठरेल, असे सांगितले. तसेच शेडशाळ येथील महिलांनी सुरू केलेल्या सेंद्रिय बीज भांडारालाही त्यांनी भेट देऊन महिला सक्षमीकरणाचे कौतुक केले. महिलांना सेंद्रिय उत्पादन विक्री व पॅकिंगचे प्रशिक्षण देण्यासाठी पुणे व बारामती येथे आमंत्रण देण्यात आले.



गणपतराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेले हे उपक्रम शेतकऱ्यांना आर्थिक समृद्धीकडे नेणारे असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी कारखान्याचे पदाधिकारी, अधिकारी, महिला सदस्य व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हरवलेला मोबाईल चंदननगर पोलिसांकडून परत

**पुणे : हॅलो प्रभात**

श्रीमती काजल महेंद्र परिहार रा. पुण्यनगरी आनंद पार्क वडगांव शेरी पुणे. यांचा मोबाईल आनंद पार्क, वडगावशेरी येथून फिनिक्स मॉल कडे रिक्षा मधून जात असताना रिक्षामध्येच पडला होता. फिनिक्स मॉल येथे उतरल्यानंतर मोबाईल नसल्याचे लक्षात आल्याने श्रीमती काजल परिहार यांनी तात्काळ मदतीकरिता महात्मा फुले चौकीला आले असता चंदन नगर पोलिस स्टेशन येथील मार्शल ड्युटीवरील अमोल ढाकणे व रोहित सूर्यवंशी यांनी तात्काळ मदत करून घडले प्रकाराची माहिती घेऊन रिक्षाचा नंबर प्राप्त करून त्यावरून रिक्षा चालकाचा मोबाईल नंबर मिळवून त्यास पोलिसांनी फोन करून घडला प्रकार सांगून नमूद प्रवासी यांचा मोबाईल 20 मिनिटांमध्ये शोधून काढला व त्यांच्या ताब्यात दिला. त्याबद्दल श्रीमती काजल परिहार यांनी पुणे पोलीस दलाचे व चंदननगर पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक करून आभार मानले. या केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल पोलिस कर्मचाऱ्यांचा वरिष्ठ पोलिस निरीक्षक निलेश बडाख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



# उपजिल्हा रुग्णालयाच्या मागणीवर प्रशासनाचे लेखी आश्वासन : प्रिया बिरादार यांचे उपोषण स्थगित



**शिरूर : हॅलो प्रभात**

शिरूर शहरात १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयासाठी जागा उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी सुरू असलेले बेमुदत उपोषण प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले. शहर भाजप महिला आघाडीच्या अध्यक्षा प्रिया बिरादार यांनी शिरूर तहसील कार्यालयासमोर सुरू केलेले उपोषण तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांनी मागण्या मान्य करत लेखी आश्वासन दिल्यानंतर मागे घेण्यात आले. या आंदोलनाला विविध राजकीय, सामाजिक व महिला संघटनांचा मोठा पाठिंबा मिळाला होता. शिरूर शहरासाठी उपजिल्हा रुग्णालयाची जागा निश्चित करून परिपूर्ण प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवावा, तसेच शासकीय आधार केंद्र सुरू करावे, सीएससी केंद्रांवर शुल्क फलक लावावेत, अशा मागण्या करण्यात आल्या होत्या. ११ सप्टेंबर २०२५ पासून सातत्याने पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून अपेक्षित कार्यवाही न झाल्याचा आरोप करत प्रिया बिरादार यांनी उपोषण सुरू केले होते. तसेच काही अधिकाऱ्यांकडून चुकीचा प्रस्ताव पाठवून नागरिकांची दिशाभूल केल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला होता. दरम्यान, तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांनी तातडीने संयुक्त बैठक घेत प्रस्तावातील त्रुटी दुरुस्त करण्याचे निर्देश दिले. ८ मे रोजी जागेची मोजणी करून सुधारित प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवण्यात येईल, असे लेखी आश्वासन देण्यात आले. या आश्वासनानंतर उपोषण स्थगित करण्यात आले. या आंदोलनाला नागरिक, महिला व विविध संघटनांनी मोठ्या प्रमाणावर पाठिंबा दर्शवला. शिरूर शहरात उपजिल्हा रुग्णालयाची आवश्यकता असल्याचे यावेळी सर्वांनी अधोरेखित केले.

# सासवडमध्ये जनगणना २०२७ 'स्व-गणना' मोहिमेला प्रारंभ

## नागरिकांना माहिती नोंदविण्याचे आवाहन

**पुरंदर : हॅलो प्रभात**

नगरपरिषदेतर्फे भारत सरकारच्या जनगणना २०२७ उपक्रमांतर्गत 'स्व-गणना' (सेल्फ एन्युमरेशन) मोहिमेला सुरुवात करण्यात आली आहे. नागरिकांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. या मोहिमेमुळे नागरिकांना स्वतःची व कुटुंबाची माहिती सुरक्षित आणि सुलभ डिजिटल पद्धतीने नोंदविण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. नागरिकांनी अधिकृत संकेतस्थळावर जाऊन मोबाईल क्रमांकाच्या साहाय्याने ओटीपीद्वारे लॉग-इन करून माहिती भरावी. राज्य, जिल्हा व स्थानिक तपशील अचूक निवडण्यासोबतच डिजिटल नकाशावर घराचे स्थान चिन्हांकित करणे आवश्यक आहे.

प्रशासनाच्या माहितीनुसार, महाराष्ट्रात स्व-गणना कालावधी १ मे ते १५ मे २०२७ असा निश्चित करण्यात आला आहे. त्यानंतर १६ मे ते १४ जूनदरम्यान घरगुती नोंदणी प्रक्रिया पार पडणार आहे. नागरिकांनी माहिती अचूक भरून अर्ज सादर केल्यानंतर मिळणारा एसई आयडी सुरक्षित ठेवावा. आवश्यकतेनुसार प्रगणक घरी भेट देऊन पडताळणी करणार असल्याने त्यांना सहकार्य करावे, असेही प्रशासनाने नमूद केले. या डिजिटल उपक्रमामुळे जनगणना प्रक्रिया अधिक पारदर्शक व प्रभावी होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

> **नागरिकांनी स्व-गणना मोहिमेचा लाभ घ्यावा आणि जनगणना २०२७ मध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा. ही आपली जबाबदारी असून देशाच्या विकासासाठी महत्त्वाची आहे.**
> **- डॉ.कैलास चव्हाण, मुख्याधिकारी, सासवड नगरपरिषद**

## थोडक्यात पण महत्वाचे

### शिरूर नगरपरिषदेत राष्ट्रीय जनगणना २०२७ उपक्रमास प्रारंभ

**शिरूर : हॅलो प्रभात**




शिरूर नगरपरिषद हद्दीत राष्ट्रीय जनगणना २०२७ या महत्त्वपूर्ण उपक्रमास सुरुवात झाली असून ही जनगणना डिजिटल व आधुनिक पद्धतीने राबविण्यात येत आहे. नागरिकांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून शहराच्या विकासात हातभार लावावा, असे आवाहन नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजीत पाचर्णे यांनी केले आहे. जनगणना ही केवळ लोकसंख्या मोजणी नसून शहराच्या भविष्यातील विकास आराखड्याचा आधारस्तंभ असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. केंद्र व राज्य शासनाकडून मिळणारा निधी, पायाभूत सुविधा तसेच आरोग्य व शिक्षण योजनांचे नियोजन जनगणनेतील अचूक माहितीवर अवलंबून असते. स्वयं जनगणना टप्पा सुरू असून १ मे ते १५ मे २०२६ दरम्यान नागरिकांनी ऑनलाईन माहिती नोंदवावी. त्यानंतर १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत प्रगणक घरोघरी जाऊन पडताळणी करणार आहेत. नगरपरिषदेकडून १०० हून अधिक अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून प्रत्येक प्रभागात नियोजनबद्ध काम सुरू आहे. मुख्याधिकारी प्रीतम पाटील यांनीही नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवावा असे आवाहन केले आहे. नागरिकांनी se.census.gov.in या संकेतस्थळावर जाऊन माहिती भरावी व मिळालेला SE ID सुरक्षित ठेवावा, असे प्रशासनाने सांगितले आहे.

### जुन्नर तहसील कार्यालयावर लोककलावंतांचे गजर आंदोलन

**जुन्नर : हॅलो प्रभात**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथे 21 मे रोजी तहसीलदार कार्यालयावर लोककलावंतांचे भव्य गजर आंदोलन होणार असून, सुमारे अडीच हजार ग्रामीण कलावंत सहभागी होणार असल्याची माहिती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गवनेरजी सरोदे यांनी दिली आहे. पुणे जिल्हा 'कलावंतांची पंढरी' म्हणून ओळखला जात असतानाही कलावंतांना न्याय मिळत नसल्याची खंत व्यक्त करण्यात आली आहे. 2024 चा प्रस्ताव सांस्कृतिक कार्य संचालनालयाने मंजूर करून जिल्हा परिषदेकडे पाठवला असला, तरी त्याची पडताळणी न झाल्याने मानधनधारकांची नावे जाहीर करण्यात आलेली नाहीत. तसेच, संबंधितांकडून माहिती मागितल्यास समाधानकारक उत्तर मिळत नसल्याची तक्रार आहे. जिल्हा परिषदेकडील मानधन समिती अद्याप कार्यरत नसल्याचेही सांगण्यात आले. 'राजश्री शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजना' अंतर्गत अनेक कलावंत वंचित राहिले आहेत. 2024-25 व 2025-26 च्या प्रस्तावांबाबत स्पष्ट माहिती उपलब्ध नसल्याने संभ्रमाचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर लोककलावंत सांस्कृतिक विचार मंचाच्या वतीने कलावंत आपल्या कला साहित्यांसह आंदोलन करून शासनाचे लक्ष वेधणार आहेत.

### 'संघर्ष एका शिक्षकाचा' पुस्तकाचे प्रकाशन

**जुन्नर शहर : हॅलो प्रभात**

प्रा.के.एस.जगताप लिखित 'संघर्ष एका शिक्षकाचा' या पुस्तकाचे प्रकाशन हडपसर येथील अण्णासाहेब मगर महाविद्यालयात उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष फ. मु. शिंदे यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी बोलताना फ. मु. शिंदे यांनी हे पुस्तक नव्या पिढीसाठी दिशादर्शक ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रा. के. एस. धोमसे, पीडीसीसी बँकेचे संचालक सुरेश घुले, शिक्षक लोकशाही आघाडीचे अध्यक्ष जी. के. थोरात, जिजामाता महिला बँकेचे संचालक अशोक काकडे, हवेली पंचायत समितीचे सभापती अशोक मोरे, नगरसेवक दादा कोंडरे यांसह विविध मान्यवर उपस्थित होते. प्रा. जगताप यांनी आपल्या भाषणात, आयुष्यातील संघर्षमय प्रवास समाजापुढे मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न या पुस्तकातून केल्याचे सांगितले. यापूर्वी प्रकाशित 'तारांबळ' या पुस्तकाला मिळालेल्या प्रतिसादातून प्रेरणा घेऊन हे पुस्तक साकारले असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका सुजाता टोके यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. नॅनोबा शिंदे यांनी केले.

# नसरापूर प्रकरणाने संतापाची लाट

## आरोपीस कठोर शिक्षेसाठी महिला आघाडीचे निवेदन

**सातारा : हॅलो प्रभात**

भोर तालुक्यातील नसरापूर येथे अल्पवयीन चिमुरडीवर झालेल्या अत्यंत क्रूर अत्याचार व हत्येच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात तीव्र संताप व्यक्त होत आहे. या घटनेचा निषेध करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) महिला आघाडी, सातारा जिल्हा यांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनामध्ये आरोपीविरुद्ध जलदगती न्यायालयात खटला चालवून कठोरात कठोर शिक्षा देण्याची ठाम मागणी करण्यात आली आहे. तसेच, आरोपीचा पूर्व इतिहास लक्षात घेता प्रशासनाने वेळीच योग्य ती कारवाई केली असती, तर ही दुर्दैवी घटना टळू शकली असती, असा आरोपही महिला आघाडीने केला आहे.



यासोबतच, अशा प्रवृत्तीच्या गुन्हेगारांवर सतत नजर ठेवण्यासाठी सक्षम यंत्रणा उभारण्याची गरज अधोरेखित करण्यात आली आहे. महिला व बालकांच्या सुरक्षेसाठी जिल्ह्यात अधिक कडक आणि प्रभावी उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली. भविष्यात अशा गंभीर घटनांमध्ये प्रशासनाची जबाबदारी स्पष्टपणे निश्चित करावी आणि कोणताही हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असा इशाराही यावेळी देण्यात आला. या निवेदनावर महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस सुवणादेवी नरेंद्र पाटील, प्रदेश उपाध्यक्ष समीद्रा बापू नाधव, शहराध्यक्षा तेजस्विनी नवनाथ केसकर यांच्यासह महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# उन्हाळ्यात प्रोटीनयुक्त आहार खा

**पुणे : हॅलो प्रभात**

उन्हाळा लवकरच आला आहे, आणि किनाऱ्यावर जाण्याचे ट्रिप्स डोळ्यासमोर आहेत, आता तुमच्या फिटनेस रूटीनला सुरू करण्यासाठी योग्य वेळ आहे. जिम सेशन्स महत्त्वाचे असले तरी, आहार निरोगी शरीराचे वजन स्कल्प्ट आणि मेंटेन करण्यात तितकाच महत्त्वाचा भूमिका बजावतो. रितिका समद्दार, येथील प्रादेशिक प्रमुख डायटेटिक्स मॅक्स हेल्थकेअर – नवी दिल्ली -यांचा सल्ला असा आहे की कॅलिफोर्निया ॲल्मंड्स, ग्रीक दही आणि सॅल्मन यांचा समावेश असलेली ही सोपी, प्रोटीन-युक्त योजना उपयुक्त ठरते. दिवसाची सुरुवात करा काही



कॅलिफोर्निया ॲल्मंड्स घेऊन. प्रोटीन, आरोग्यदायी फॅट्स, व्हिटॅमिन ई आणि मॅग्नेशियमने भरलेले हे ॲल्मंड्स तुम्हाला ऊर्जेची पातळी स्थिर ठेवण्यास मदत करतात, अचानक उर्जा वाढीशिवाय. कोणत्याही फिटनेस-केंद्रित आहारासाठी हे उत्कृष्ट आहेत. त्यांना दोन उकडलेली अंडी जोडा, जेणेकरून तुम्हाला संपूर्ण प्रोटीन मिळेल.

# पुरंदर विमानतळ प्रकल्पाला गती : जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

**पुरंदर : हॅलो प्रभात**

छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या भूसंपादन प्रक्रियेला गती देण्यात आली असून शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देण्यात येत असल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी पत्रकार परिषदेत दिली. पुणे जिल्ह्यातील सात गावांमधील 1216.75 हेक्टर जमीन भूसंपादनासाठी निश्चित करण्यात आली असून शासनाने मोबदल्याबाबत स्पष्ट धोरण जाहीर केले आहे. बाजारभावाच्या आधारे निश्चित दरांवर 12 टक्के अतिरिक्त मोबदला देण्यात येणार असल्याने शेतकऱ्यांना न्याय्य व स्पर्धात्मक दर मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. उदाचीवाडी, वनपुरी, कुंभारवळण, खानवडी, मुंजवडी, एखतपूर व पारगाव या गावांचा या प्रकल्पात समावेश आहे. जमिनीबरोबरच घरे, झाडे, विहिरी, बोअरवेल व



इतर स्थावर मालमत्तेचे स्वतंत्र मूल्यांकन केले जाणार आहे. फळझाडांसाठी प्रकारानुसार 4 हजार ते 60 हजार रुपयांपर्यंत मोबदला निश्चित करण्यात आला आहे. पुनर्वसनासाठी संमती देणाऱ्या शेतकऱ्यांना 500 दिवसांच्या मजुरीइतकी आर्थिक मदत तसेच घर स्थलांतरासाठी 40 हजार रुपये अतिरिक्त सहाय्य दिले जाणार आहे. सर्व मोबदला थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केला जाणार असल्याने प्रक्रिया पारदर्शक राहील, असे डुडी यांनी स्पष्ट केले. आतापर्यंत 244 जमीनमालकांनी 436 एकर क्षेत्रासाठी संमती दिली असून 6 मे ते 10 जून दरम्यान विशेष शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत.

# वाघोलीत नसरापूर घटनेचा तीव्र निषेध

**वाघोली : हॅलो प्रभात**

नसरापूर येथे एका चिमुरडीवर झालेल्या अमानुष अत्याचाराच्या घटनेने संपूर्ण परिसर हादरला असून, या घटनेच्या निषेधार्थ वाघोली येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने प्रदेश सरचिटणीस सिमात्ताई गुट्टे यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन करण्यात आले. या घटनेमुळे नागरिकांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत असून आरोपींवर तात्काळ आणि कठोर कारवाईची करण्याची मागणी करण्यात आली. आंदोलनात स्थानिक नागरिक, महिला कार्यकर्त्या तसेच विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हातात फलक घेऊन आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत प्रशासनाचे लक्ष वेधले. "बलात्काऱ्यांना फाशी द्या", "महिलांना न्याय मिळालाच पाहिजे" अशा घोषणा देण्यात आल्या. यावेळी सिमात्ताई गुट्टे म्हणाल्या एका निरपराध चिमुरडीवर झालेला हा अत्याचार मानवतेला काळिमा फासणारा असून समाजासाठी अत्यंत लज्जास्पद आहे. अशा घटनांमुळे महिलांसह लहान मुलींमध्येही भीतीचे वातावरण निर्माण होत आहे. त्यामुळे सरकार आणि पोलिस प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत आरोपींना तातडीने अटक करून कठोर शिक्षा द्यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली. महिलांच्या सुरक्षिततेसाठी कडक कायदे असले तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याबद्दलही आंदोलकांनी नाराजी व्यक्त केली. भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.




## आरोपीला कठोर शिक्षेची मागणी

या आंदोलनात महिलांचा लक्षणीय सहभाग दिसून आला. समाजातील प्रत्येक घटकाने एकत्र येऊन अशा घृणास्पद कृत्यांविरोधात आवाज उठवणे अत्यावश्यक असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.यावेळी काँग्रेसच्या नेत्या सीमाताई गुट्टे, प्रकाश जमधडे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला व नागरिक, उपस्थित होते.

# अंगणवाडी सेविका मंगल माळी यांचा सेवानिवृत्ती सत्कार



शिराळा : हॅलो प्रभात

अंगणवाडी ही ग्रामीण भागातील महत्त्वाची योजना असून माणसाच्या आयुष्यातील पहिल्या टप्प्याची सुरुवात अंगणवाडीतून होते. अंगणवाडी सेविका या गावांमध्ये देवदूतासारखी भूमिका बजावत असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषद सदस्य राजेश्वरी रणधीर नाईक यांनी केले.

खेड (ता.शिराळा) येथील अंगणवाडी सेविका मंगल रघुनाथ माळी यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित सत्कार समारंभात त्या बोलत होत्या. या कार्यक्रमास पंचायत समिती सदस्या सविता महाडिक प्रमुख उपस्थित होत्या.

राजेश्वरी नाईक यांनी पुढे सांगितले की, अंगणवाडी सेविका पूर्व-शालेय शिक्षण, कुपोषण निर्मूलन तसेच माता-बाल मृत्यूदर कमी करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. मंगल माळी यांनी खेड गावात सेविका म्हणून उल्लेखनीय कार्य केले असून गावाशी त्यांचा जिव्हाळ्याचा संबंध निर्माण झाल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास पशुवैद्यकीय अधिकारी कृष्णात माळी, बाजार समिती उपाध्यक्ष विजय महाडिक, बाल विकास प्रकल्प अधिकारी विद्या पाटील, ग्रामसेविका प्रणिती पाटील, सरपंच सविता सातपुते, उपसरपंच रेखाताई खबाले, पोलीस पाटील सोनल माळी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले असून उपस्थित मान्यवरांनी मंगल माळी यांच्या कार्याचे कौतुक केले.

# लेफ्टनंट पदावर दत्तात्रय चौगुले यांची निवड



## शिवाजीराव नाईक यांच्या हस्ते सत्कार

शिराळा : हॅलो प्रभात

अंत्री बुद्रुक (ता.शिराळा) येथील सुपुत्र दत्तात्रय जगन्नाथ चौगुले यांची सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड मार्फत घेण्यात आलेल्या पर्मनंट कमिशन स्पेशल लिस्ट २०२५ परीक्षेत लेफ्टनंट पदावर निवड झाल्याबद्दल त्यांचा शिराळा येथे सत्कार करण्यात आला. हा सत्कार माजी मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष शिवाजीराव नाईक यांच्या हस्ते पार पडला. यावेळी बोलताना त्यांनी चौगुले यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण करत जिद्द, चिकाटी आणि सातत्याच्या जोरावर हे यश मिळवले असल्याचे सांगितले. अपयशानंतरही हार न मानता केलेल्या मेहनतीतून इतर विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी, असेही त्यांनी नमूद केले. या प्रसंगी माजी सैनिक संजय पालकर, पी. आर. पोतदार, ज्योतिर्लिंग पाटील, माजी उपसभापती अशोकराव पाटील, पंचायत समिती सदस्य रवींद्र आढाव, संचालक प्रकाश पाटील, पैलवान वसंतराव पाटील, प्रतापराव चव्हाण, वाय. बी. पाटील, भगवान पाटील, विलास चौगुले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश गिरी यांनी केले. लेफ्टनंट दत्तात्रय चौगुले यांच्या निवडीमुळे शिराळा तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून त्यांच्या पुढील देशसेवेच्या वाटचालीसाठी सर्वत्र शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# गरवारे कन्या महाविद्यालयात महाराष्ट्र दिन साजरा



सांगली : हॅलो प्रभात

श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयात महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. अनिल सुगते यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी प्राचार्य डॉ. सुगते यांनी १ मे १९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची झालेली निर्मिती याचा ऐतिहासिक आढावा घेतला. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत १०५ हुतात्म्यांनी दिलेल्या बलिदानाचे स्मरण करून त्यांनी त्या संघर्षाची जाणीव उपस्थितांना करून दिली. मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात कामगार आणि सर्वसामान्य जनतेने दिलेल्या लढ्यामुळेच महाराष्ट्र राज्याची निर्मिती शक्य झाली, असे त्यांनी नमूद केले.

कामगार दिनाच्या औचित्याने महाविद्यालयातील ग्रंथालय परिचर सुमनताई चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला. “भौतिक प्रगतीच्या पायाभूत रचनेत कामगारांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. उंच इमारती, उद्योग आणि विकासकामे ही कामगारांच्या कष्टातून उभी राहतात. त्यामुळे कामगारांविषयी कृतज्ञता आणि आदरभाव कायम ठेवला पाहिजे,” असे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी अकरावीमध्ये उत्तीर्ण होऊन प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केलेल्या विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक कनिष्ठ विभागाच्या पर्यवेक्षिका श्रीमती सुनीता माळी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. लीना पाटील यांनी तर आभार श्रीमती नीता कारंडे यांनी मानले.

कार्यक्रमास वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# मतदार याद्यांतील त्रुटी दूर करून बोगस मतदान हाणून पाडा : आ.राजेश क्षीरसागर

कोल्हापूर : माहेश्वरी घोरपडे



भारतीय निवडणूक आयोगाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेत सक्रिय सहभाग घेत मतदार याद्यांमधील त्रुटी दूर कराव्यात आणि बोगस मतदानाचे मनसुबे उधळून लावावेत, असे आवाहन आमदार राजेश क्षीरसागर यांनी केले. शासकीय विश्रामगृह येथे आयोजित शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांच्या बैठकीत ते बोलत होते.

यावेळी त्यांनी बूथ लेव्हल ऑफिसरशी (बीएलओ) संपर्क साधून प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या भागात प्रत्यक्ष पडताळणी करावी, असे सांगितले.

कोल्हापूर जिल्ह्यातील सुमारे ९ लाख मतदारांचे मॅपिंग अद्याप अचूक नसल्याचा उल्लेख करत, एकाच मतदाराची नावे विविध केंद्रांवर आहेत का, याची तपासणी करावी. गावात वास्तव्यास नसलेल्या व्यक्तींची नावे वगळण्यासाठी पाठपुरावा करावा. तसेच संशयास्पद नोंदींचे प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण करून अचूक माहिती संकलित करावी, असे निर्देश त्यांनी दिले. प्रत्येक मतदाराचा मोबाईल क्रमांक व आधार कार्ड मतदार ओळखपत्राशी लिंक करण्यावर भर देत त्यांनी बनावट मतदान रोखण्याचे महत्त्व स्पष्ट केले. मागील निवडणुकीतील आकडेवारी व नव्या नोंदणीचा तुलनात्मक अभ्यास करून संवेदनशील भागांवर विशेष लक्ष केंद्रित करण्याचेही त्यांनी सांगितले. दरम्यान, विरोधकांवर टीका करत ते म्हणाले, जनाधार नसल्याने विरोधक बोगस मतदानाच्या जोरावर यश मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. या बैठकीत शारंगधर देशमुख, ऋतुराज क्षीरसागर, अभिजित खतकर, आस्कीन आजरेकर यांच्यासह अनेक पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जयसिंगपुरात आज सद्गुरु संत बाळूमामा भंडारा उत्सव सोहळा

## गुरुमाऊली कृष्णात डोणे यांची प्रमुख उपस्थिती

जयसिंगपूर : हॅलो प्रभात

जयसिंगपूर शहरातील नांदणी रोड परिसरातील संभाजीनगर, शिवसागर कॉलनी (कलावती मंदिर शेजारी, काडगे मळा) येथे आज बुधवार दि. ६ मे रोजी सद्गुरू संत बाळूमामा भंडारा उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यास प्रमुख उपस्थिती म्हणून आदमापूर येथील श्री संत बाळूमामा देवस्थानचे भाकणूक व कथनकार गुरुमाऊली कृष्णात बाबुराव डोणे (वाघापूरे महाराज) उपस्थित राहणार असून त्यांच्या शुभहस्ते महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.

उत्सवाची सुरुवात सायंकाळी ४ वाजता नांदणी रोड, डेबॉन्स कॉर्नर (११ वी गल्ली) येथून भव्य पालखी मिरवणुकीने होणार आहे. पारंपरिक वाद्यांच्या गजरात ही मिरवणूक काढण्यात येणार असून ती भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे.

### ▶▶ पालखी मिरवणूक व धनगरी ओव्यांचे आकर्षण



यानंतर सायंकाळी ६ वाजता अभिषेक व फोटो पूजन, तर ७ वाजता श्रींची महाआरती होणार आहे. साडेसात वाजता वाघापूरे महाराज यांच्या हस्ते महाप्रसादाचे वाटप होईल.

रात्री ९ वाजता धनगरी ओव्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, यामध्ये शाहीर भगवान कोळेकर व शाहीर बाळू खोत आपली कला सादर करणार आहेत. मागील वर्षी हा उत्सव मोठ्या उत्साहात पार पडला होता व हजारो भाविकांनी उपस्थिती लावली होती. यंदाही मोठ्या जल्लोषात उत्सव साजरा करण्यासाठी भंडारा उत्सव समितीकडून जय्यत तयारी करण्यात आली असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

# झेडपीच्या अधिकाऱ्यांना अध्यक्षांचे खडेबोल

सातारा : हॅलो प्रभात

अधिकाऱ्यांनी प्रशासक राजवट असल्याचा अविर्भाव बाजूला ठेवून काम करावे. ४० हजार लोकांचे प्रतिनिधित्व करुन सदस्य निवडून येत असतात. त्यामुळे पदाधिकारी, सदस्यांचा मान सन्मान राखायला हवा. पदाधिकारी व अधिकाऱ्यांनी समन्वय साधत आपापल्या विभागाच्या योजनांची अंमलबजावणी करावी. प्रत्येक वेळेस सर्वच खातेप्रमुखांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आड दडू नये, अशा शब्दात जि.प. अध्यक्षा डॉ. प्रिया शिंदे व उपाध्यक्ष राजू भोसले यांनी अधिकाऱ्यांना खडेबोल सुनावले.

# महाराष्ट्राच्या शिल्पकारांचे स्मारकच झाले उपेक्षित

देवराष्ट्रे : संदेश जाधव



आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृती जपण्यासाठी त्यांच्या जन्मगावी देवराष्ट्रे (ता. कडेगाव) येथे उभारण्यात आलेल्या यशवंतराव चव्हाण स्मृतिन्यास इमारतीची सध्या मोठी दुरावस्था झाली आहे. देखभालीअभावी इमारतीची मोठ्या प्रमाणात पडझड झाली असून प्रशासनाच्या या उदाशीन कारभारावर स्थानिक नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. सध्या या इमारतीच्या गॅलरीतील पीओपी चे तुकडे खाली पडले असून त्यामुळे इमारतीच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. केवळ छतच नाही तर स्मारकामध्ये असलेल्या यशवंतराव चव्हाण यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या परिसरातील कठड्याच्या फरश्या देखील अनेक ठिकाणी निखळलेल्या आहेत. २०१५ साली यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षांमध्ये या परिसराच्या विकासासाठी लाखो रुपयांचा विकास निधी खर्च करण्यात आला होता. मात्र त्यानंतर या परिसराची नियमित देखभाल व दुरुस्ती न झाल्यामुळे या परिसराची दयनीय अवस्था झाल्याचे दिसून येत आहे इमारत नियमित उघडली जात नसल्यामुळे इमारतीमध्ये घाणीचे साम्राज्य पसरले आहे.



तसेच इमारतीमधील फॅन व इतर इलेक्ट्रिक वस्तू नादुरुस्त अवस्थेत आहेत. या स्मृती न्यासास अनेक पर्यटक विद्यार्थी भेट देत असतात मात्र याची दुरावस्था पाहून प्रशासनाच्या कारभारावर पर्यटक व विद्यार्थी नाराजी व्यक्त करत आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणात व विकासात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या थोर नेत्याच्या स्मारकाची अशी अवस्था होणे क्लेशदायक आहे अशी भावना स्थानिक व्यक्त करत आहेत. संबंधित प्रशासनाने या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन इमारती देखभाल व दुरुस्ती करावी अशी मागणी आता जोर धरु लागली आहे.

# डीकेटीईच्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्तरावर दमदार कामगिरी

इचलकरंजी : हॅलो प्रभात

येथील डीकेटीई टेक्स्टाईल ॲण्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटच्या सिव्हील विभागातील विद्यार्थ्यांनी विविध राष्ट्रीय पातळीवरील प्रकल्प स्पर्धा, हॅकॅथॉन व तांत्रिक स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. नव्या शैक्षणिक धोरणानुसार अध्यापनासोबत संशोधन व उद्योजकता विकासावर दिल्या जाणाऱ्या भरामुळे तसेच आयआयसी, स्टार्टअप व युक्ती सेलच्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनात्मक वृत्ती विकसित झाली आहे. याच पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, इलेक्ट्रॉनिक्स व सॉफ्टवेअरचा वापर करून बांधकाम क्षेत्र, नागरी सुरक्षितता, स्मार्ट पार्किंग, कृषी आणि




अंतराळ संशोधनाशी संबंधित विविध अभिनव प्रकल्प विकसित केले आहेत.

या प्रकल्पांच्या जोरावर विद्यार्थ्यांनी गेल्या वर्षभरात १२ हून अधिक पारितोषिके मिळवली असून त्यामध्ये ६ प्रथम क्रमांकांचा समावेश आहे. वासवी कॉलेज (तेलंगणा), वॉलचंद कॉलेज (सांगली), संत गजानन महाराज कॉलेज (महागाव), डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज (जयसिंगपूर), तात्यासाहेब कोरे इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट (वारणानगर) व अशोकराव माने इंजिनिअरिंग कॉलेज (वाठार) येथे विद्यार्थ्यांनी आपल्या प्रकल्पांचे यशस्वी सादरीकरण केले. तसेच द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ अशा आणखी ६ पारितोषिकांची भर घातली.

संस्थेच्या आयडिया लॅबमधून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे मार्गदर्शन मिळत असल्याने विद्यार्थ्यांची नवोन्मेष क्षमता वाढत असून ते राष्ट्रीय स्तरावर ठसा उमटवत आहेत, असा विश्वास संचालिका डॉ. एल. एस. आडमुठे यांनी व्यक्त केला. संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाणा आवाडे, माजी मंत्री प्रकाश आवाडे व इतर पदाधिकाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# आंबट-गोड जांभूळासह करवंदाची चव झाली दुर्मिळ

कवठेमहंकाळ : हॅलो प्रभात



तालुक्यातील घाटमाथ्यावरील घाटनांद्रे, तिसंगी, वाघोली, गर्जेवाडी, पुर्वी कुंडलापुर, जाखापुर व कुची परिसरातील डोंगरदऱ्यासह ओढ्याच्या काठावर, विहिरीच्या भोवती पुर्वी मुबलक प्रमाणात जांभळाची व करवंदाची झाडे होती.पण आजपर्यंत झालेल्या वृक्षतोडीमुळे तीच जांभळाची व करवंदाची झाडे सध्या दिसेनाशी झाली आहेत.

जांभळाच्या झाडाचे लाकूड हे कठीण,टणक, मजबूत व एक सारखे उभे असल्याने अगदी पुर्वी पासुनच घरबांधणीसाठी,बैलगाडी तयार करण्यासाठी व इंधन म्हणून वापरले जात असल्याने मोठ्या प्रमाणात जांभळाच्या झाडांची तोड झाली आहे.परंतू जांभळाची लागवड झाल्याचे प्रमाण मात्र झिरोच राहीले आहे.

घाटमाथ्यावर सध्या जुनी जांभळाची झाडेही मोठ्या प्रमाणावर कमी झाल्याचे दिसून येत आहे. शिल्लक राहीलेली झाडे देखील आता फारशी उपयुक्त ठरताना दिसत नाहीत.पुर्वीच्या झाडांच्या प्रमाणात या झाडांची लागवडही होत नाही. परंतु नवीन जातीच्या जांभळाची झाडांची फारशी वाढ काही होत नाही.तर करवंदाच्या नशिबी कायम दुर्लक्षीतपणाच आला आहे. त्यामुळे गावरान जांभळाचा व करवंदाचा पहिल्या प्रमाणे आस्वाद घेणे नागरिकांना सध्या फारच दुर्मिळ झाले आहे.

निसर्गाचा नेहमीचा लहरीपणा, पावसासह वातावरणात होणारे बदल, अवेळी पडणार्या पावसाचा परिणाम जांभुळ व करवंदे पिकावर झाला आहे.जांभळांची तर जुन अखेर वाट बघावी लागत आहे.कारण अनेक झाडांना मोहोर आला पण फळे आलेली नाहीत.परिणामी शिराळा तालुक्यातील ग्रामीण भागातील आलेल्या जांभळे व करवंदे विक्रेत्यांचा कडून यांचा आस्वाद घ्यावा लागतो आहे.

# मुरगूड विद्यालयाचा बारावी निकाल ८६.९४%

## प्राजक्ता पाटील, सुमेध सावर्डेकर केंद्रात प्रथम

मुरगूड : हॅलो प्रभात

नुकत्याच जाहीर झालेल्या बारावी परीक्षेत मुरगूड विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयाचा एकूण निकाल ८६.९४ टक्के इतका लागला असून विद्यार्थी व पालकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

कला शाखेत प्राजक्ता शंकर पाटील हिने ८५ टक्के गुण मिळवत मुरगूड केंद्रात प्रथम क्रमांक पटकावला. अक्षरा शिवाजी गोल्हार (८२.३६%) द्वितीय तर सलोनी संदीप शिंदे (७६.३६%) तृतीय आली. कला शाखेचा एकूण



निकाल ७३.२५ टक्के इतका लागला.

विज्ञान शाखेत सुमेध सुधीर सावर्डेकर याने ८५ टक्के गुण मिळवत केंद्रात प्रथम क्रमांक मिळवला. सुमित सुधीर सावर्डेकर (८४.१७%) द्वितीय तर साईराज महादेव माने (७३.३३%) तृतीय ठरला. विज्ञान शाखेचा निकाल ९७.०३ टक्के इतका विक्रमी लागला. वाणिज्य शाखेत प्रेम जगदीश कांबळे (७८.५०%) तृतीय, धनश्री शशिकांत पाटील (७६.५०%) द्वितीय व पूजा सातापा आरागडे (७४.६७%) तृतीय क्रमांकावर राहिले. वाणिज्य शाखेचा निकाल ८२.९७ टक्के इतका लागला. या परीक्षेसाठी एकूण २६८ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते, त्यापैकी २३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शिक्षण प्रसारक मंडळाचे पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. मार्गदर्शन व प्रोत्साहनाबद्दल सर्व स्तरांतून समाधान व्यक्त करण्यात आले.

# ‘यश खंडागळे’ला वेटलिफ्टिंग स्पर्धेत रौप्यपदक

## सांगलीच्या सलून व्यावसायिकाच्या मुलाचे यश

सांगली : हॅलो प्रभात

इजिप्तमधील इस्मालिया येथे सुरू असलेल्या कनिष्ठ जागतिक वेटलिफ्टिंग स्पर्धेत सांगलीच्या यश खंडागळेने रौप्यपदक पटकावत देशाचे नाव रोशन केले. ७१ किलो वजनी गटात त्याने १४० किलो स्नॅच आणि १६९ किलो क्लीन अँड जर्क असे एकूण ३०९ किलो वजन उचलत ऐतिहासिक कामगिरी केली.कनिष्ठ जागतिक वेटलिफ्टिंग स्पर्धेच्या इतिहासात भारताला मिळालेले हे पहिलेच रौप्यपदक असून यापूर्वी फक्त तीन भारतीय खेळाडूंना कांस्य पदक मिळवता आले होते. दरम्यान, यश सराव करत असलेल्या येथील दिग्विजय व्यायामसंस्थेत आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

यश खंडागळे हा सांगलीच्या दिग्विजय वेटलिफ्टिंग इन्स्टिट्यूटचा खेळाडू असून प्रशिक्षक मयूर सिंहासने यांच्या मार्गदर्शनाखाली त्याचे वेटलिफ्टिंगचे प्रशिक्षण सुरु आहे. सध्या कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयात कला शाखेच्या पहिल्या वर्षात तो शिकतो. वडील विनायक खंडागळे यांचे बालाजी मिल रोडवर सलून दुकान आहे. कॉलेज आणि खेळातील ताळमेळ साधताना तो फावल्या वेळेत वडिलांनाही मदत करतो. गेल्या आठ महिन्यांपासून तो पुण्यातील हाय परफॉर्मन्स सेंटर (HPC) येथे इराणच्या प्रशिक्षकांकडे प्रशिक्षण घेत आहे.




राष्ट्रकुल स्पर्धा आणि एशियन गेम्स २०२६ साठी यशने जोरदार तयारी केली होती. मात्र आंतरराष्ट्रीय वेटलिफ्टिंग संघटनेकडून वजनी गटांमध्ये झालेल्या बदलांमुळे त्याला त्या स्पर्धांसाठी पात्र ठरता आले नाही. तरीही त्याने निराश न होता कनिष्ठ जागतिक स्पर्धेत उत्तुंग कामगिरी केली. २०३० साली अहमदाबाद येथे होणाऱ्या राष्ट्रकुल स्पर्धेसाठी तो एक प्रबळ दावेदार मानला जात आहे.

खेळाडू व नागरिकांतर्फे त्याच्या कामगिरीबद्दल जाहीर सत्कार करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

### संघर्षातून उभारली प्रेरणादायी कहाणी

यशच्या यशामागे त्याच्या कुटुंबाचा मोठा वाटा आहे. त्याचे वडील विनायक खंडागळे यांचे केशकर्तनालय (सलून) असून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी यशला घडवले. स्वतःच्या इच्छा बाजूला ठेवून मुलाच्या आहार, सराव आणि स्पर्धांसाठी आवश्यक गोष्टी पुरवल्या आहेत. सात वर्षांच्या अथक परिश्रमानंतर त्याला रौप्य पदक मिळाले. सध्या तो इजिप्तमध्येच असून तेथून दिल्ली, पतियाळा येथे येणार असून दोन दिवसात तो सांगलीत दाखल होणार आहे.

> “ यश खंडागळेची ही गरुडझेप अनेक तरुणांना प्रेरणा देणारी ठरेल. संकेत सरगरनंतर चमकणारा तो गुणी खेळाडू आहे. भविष्यात तो देशासाठी आणखी अभिमानास्पद कामगिरी करेल, अशी आशा आहे. त्यासाठी त्याला जिल्हा परिषद, महापालिका यासह अन्य संस्था, संघटनांनी मदत करण्याची गरज आहे. परिस्थिती प्रतिकुल असल्याने भविष्यात येणारा खर्च मोठा असून त्याला हातभार लावल्यास ऑलिंपिक स्पर्धेचे पदक निश्चित आहे. कनिष्ठ जागतिक वेटलिफ्टिंग स्पर्धेतील यशामुळे त्याचा आत्मविश्वास दुणावला आहे.
>
> **मयूर सिंहासने, प्रशिक्षक**

## थोडक्यात पण महत्वाचे



### अजिंठा परिसराचा सर्वांगीण पर्यटन विकास साधणार : शंभूराज देसाई

**मुंबई : हॅलो प्रभात**

■ सिल्लोड-सोयगावमधील पर्यटन प्रकल्पांना गती देण्यासाठी आढावा बैठक

जागतिक स्तरावर पर्यटन दृष्ट्या महत्त्वाचे असलेल्या अजिंठा परिसराचा नियोजनबद्ध व सर्वांगीण विकास करण्याचे निर्देश पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिले. मुंबई येथील शासकीय निवासस्थान मेघदूत येथे अजिंठा परिसरातील पर्यटन विकासासंदर्भात आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस सिल्लोड-सोयगाव मतदारसंघाचे आमदार अब्दुल सत्तार उपस्थित होते. तसेच पर्यटन विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, पर्यटन संचालनालयाचे संचालक मंगेश जोशी, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे, उपसचिव विजय पोवार, पर्यटन संचालनालयाचे कार्यकारी अभियंता आकाश चकोर, छत्रपती संभाजीनगर सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता एस. एस. भगत तसेच संबंधित विभागांचे इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीदरम्यान अजिंठा लेणी परिसरातील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सुमारे ७०० एकर क्षेत्राच्या नियोजनबद्ध विकासासंदर्भात सविस्तर आढावा घेण्यात आला. या क्षेत्रात पर्यटकांसाठी आधुनिक व आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्याबाबत तसेच प्रकल्पांच्या टप्प्याटप्प्याने अंमलबजावणीसंदर्भात चर्चा करण्यात आली. यासाठी स्थळ पाहणी करून लोकप्रतिनिधी, स्थानिक प्रशासन व पर्यटन विभागाच्या अधिकाऱ्यांचा समावेश असलेली सल्लागार समिती स्थापन करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच अजिंठा व घटोत्कच लेणी परिसरातील पायाभूत सुविधांच्या उभारणीसह स्थानिक स्तरावर रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने व्यापार संकुल विकसित करण्याबाबत विचारविनिमय करण्यात आला. पर्यटकांसाठी स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची सुविधा, सुरक्षा व्यवस्था व इतर आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही मंत्री देसाई यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. दरम्यान शिव स्मारक व भीम पार्क या प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला.

### संस्थांच्या जतन, संवर्धनाची कामे त्वरीत करावीत : संजय शिरसाट

**मुंबई : हॅलो प्रभात**



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक कार्याला अभिवादन म्हणून द पीपल्स एज्युकेशन सोसायटीअंतर्गत शैक्षणिक संस्था व वसतिगृहांच्या जीर्णोद्धार, जतन व संवर्धनासाठी स्वतंत्र योजनेस मान्यता देण्यात आली आहे. सोसायटीअंतर्गत येणाऱ्या शैक्षणिक संस्था व वसतिगृहांच्या जतन, संवर्धन आणि जीर्णोद्धार कामांसाठी तांत्रिक प्रक्रिया वेळेत सुरू करून याबाबत परिपूर्ण नियोजन करावे, असे निर्देश सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिले. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली द पीपल्स एज्युकेशन सोसायटी मुंबई संदर्भात आढावा बैठक मंत्रालयात झाली. या बैठकीस सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, दूर दृश्य प्रणाली द्वारे समाजकल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे, सहसचिव सो.ना. बागुल, संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट म्हणाले, शैक्षणिक संस्था व वसतिगृहांच्या जीर्णोद्धार, जतन व संवर्धन या योजनेत नऊ शैक्षणिक संस्था व दोन वसतिगृहांचा समावेश असून, त्यासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. संबंधित शैक्षणिक संस्था व वसतिगृहांनी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि सामाजिक न्याय विभागाच्या अधिकाऱ्यांच्या समन्वयाने सविस्तर अंदाजपत्रक तयार करून विभागाकडे सादर करावे. सर्व संस्थांनी प्रस्ताव लवकर सादर करावेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून संवर्धनाची कामे करताना मूळ वास्तूंची ओळख अबाधित ठेवण्यात येणार आहे. या योजनेमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक वारशाचे जतन होऊन विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होतील, तसेच ऐतिहासिक शैक्षणिक संस्थांचे वैभव पुढील पिढ्यांसाठी टिकवून ठेवण्यास मदत होणार आहे.

### 'विपश्यना केंद्रा' सह बहुउद्देशीय सुविधा उभारणीला गती द्यावी

**मुंबई : हॅलो प्रभात**

जालना जिल्ह्यात 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना' अंतर्गत विपश्यना केंद्रासह वाचनालय, अभ्यासिका, धम्म केंद्र आणि प्रशिक्षण केंद्र अशा बहुउद्देशीय सुविधांच्या उभारणीला गती देण्याचे निर्देश सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिल्या आहेत. मंत्री संजय शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात जालना महानगरपालिका हददीमध्ये विपश्यना केंद्र उभारणी संदर्भात बैठक झाली. या बैठकीस आमदार अर्जुन खोतकर, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, दूरदृश्य प्रणाली द्वारे जालना महानगरपालिकेच्या आयुक्त अंजली शर्मा, जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी अशिमा मित्तल, जालना महानगरपालिकेच्या महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत तसेच संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट म्हणाले, या प्रकल्पामुळे जालना जिल्ह्यातील सामाजिक व शैक्षणिक विकासाला मोठी चालना मिळेल. 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना' अंतर्गत प्रस्तावित या प्रकल्पाचा उद्देश समाजाच्या शैक्षणिक, सांस्कृतिक आणि बौद्धिक उन्नतीला चालना देणे हा आहे. या सुविधांमुळे विद्यार्थ्यांना आधुनिक अभ्यासिकांचे वातावरण, नागरिकांना सांस्कृतिक उपक्रमांसाठी व्यासपीठ आणि समाजाला आध्यात्मिक विकासासाठी विपश्यना व धम्म केंद्रांचा लाभ मिळणार आहे.

# १० लाख कर्मचाऱ्यांसाठी तंत्रज्ञान शिक्षणाची ऐतिहासिक झेप

## 'टेक-वारी २.०' चा शुभारंभ

**मुंबई : हॅलो प्रभात**

सामान्य प्रशासन विभाग आणि इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाद्वारे आयोजित 'टेक-वारी २.० – महाराष्ट्राचा तंत्रज्ञान शिक्षण सप्ताह'चे उद्‌घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. हा भारतातील सर्वात महत्त्वाकांक्षी राज्य-नेतृत्वाखालील क्षमता-बांधणी उपक्रमांपैकी एक आहे. मंत्रालयात ४ ते ८ मे २०२६ दरम्यान चालणाऱ्या या कार्यक्रमाचा उद्देश, अत्याधुनिक तंत्रज्ञानाला आरोग्य, प्रशासकीय उत्कृष्टता आणि सांस्कृतिक मूल्यांशी जोडून सुमारे १० लाख सरकारी कर्मचाऱ्यांना सक्षम करणे हा आहे. त्रिमूर्ती प्रांगण येथे झालेल्या या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, क्षमता विकास आयोगाच्या (सीबीसी) अध्यक्षा राधा चौहान उपस्थित होते. राज्याच्या प्रगतीमधील आघाडीच्या कार्यकर्त्यांला (फ्रंटलाइन वर्कर्स) व प्रतिनिधींचाही सन्मान करण्यात आला. तबला वादक निलेश परब यांच्या 'तालरंग: लय आणि सांघिक कार्याचा प्रवास' या ऊर्जापूर्ण सादरीकरणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. डिजिटल गव्हर्नन्स यासंदर्भात




अमिताभ कांत (माजी सीईओ, नीती आयोग), राधा चौहान (सीबीसी), राजेश अग्रवाल (मुख्य सचिव), सदानंद दाते (डीजीपी, महाराष्ट्र), आणि डॉ. विवेक राघवन (सह-संस्थापक, सर्वम एआय) यांनी डिजिटल प्रशासनाचे विकसित होत असलेले स्वरूप आणि एआय-चालित कार्यक्षमतेचा आढावा घेतला. मानसिक आरोग्य आणि सर्वांगीण विकास: मनशक्ती संशोधन केंद्राने मेंदूच्या क्षमता वाढवण्यावर सत्रे आयोजित केली. साथ मेळा होलिस्टिक हेल्थ कॅम्पने कर्मचाऱ्यांना शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी संसाधने उपलब्ध करून दिली. त्रिमूर्ती प्रांगण एका टेक हबमध्ये रूपांतरित झाले, जिथे १० जागतिक नेत्यांनी थेट प्रात्यक्षिके सादर केली. मेटा (शासनासाठी व्हॉट्सॲप): एक 'ॲप-विना' गेटवे, जो नागरिकांना व्हॉट्सॲपवरील सोप्या व्हॉइस कमांडद्वारे वीज, आरोग्यसेवा आणि पोलीस सेवा मिळवण्याची सुविधा देतो. प्रभावी जनजागृती मोहिमांसाठी एक एआय-नेटिव्ह मिक्स्ड रिॲलिटी प्लॅटफॉर्म, जो कमी क्षमतेच्या स्मार्टफोनवरही १०० मिलिसेकंदांपेक्षा कमी वेळेत चालण्यासाठी डिझाइन केलेला आहे.

## राज्यव्यापी सहयोगी प्रयत्न

**'टेक-वारी २.०' हे इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाद्वारे सह-प्रायोजित आहे. याचा प्रभाव प्रत्येक जिल्ह्यापर्यंत पोहोचावा यासाठी, सर्व सत्रे राज्यातील विशाल मनुष्यबळासाठी थेट प्रक्षेपित (लाइव्ह-स्ट्रीम) केली जात आहेत. हे तंत्रज्ञान प्रदर्शन ८ मे पर्यंत दररोज खुले राहील, जे सरकारी अधिकारी आणि जागतिक तंत्रज्ञान नवोन्मेषकांमध्ये थेट संवादाला प्रोत्साहन देईल.**

## महाराष्ट्रातील हरभरा उत्पादक शेतकऱ्यांना केंद्र सरकारचा दिलासा

**नवी दिल्ली : हॅलो प्रभात**

महाराष्ट्रातील हरभरा (चना) उत्पादक शेतकऱ्यांना केंद्र सरकारने मोठा दिलासा दिला आहे. रब्बी हंगाम २०२५-२६ मध्ये चना खरेदीची कमाल मर्यादा वाढवून ८.१९ लाख मेट्रिक टन करण्यात आली आहे. या निर्णयामुळे सुमारे ४,८१६.८० कोटी रुपयांची किमान आधारभूत किंमत सुरक्षा आता शेतकऱ्यांना मिळणार आहे. केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य व हमीभाव मिळावा यासाठी हा महत्वपूर्ण निर्णय जाहीर केला आहे. याबरोबरच खरेदीची अंतिम मुदत वाढवून २९ मे २०२६ पर्यंत करण्यात आली आहे. त्यामुळे जे शेतकरी वेळेत आपला माल विकू शकले नाहीत, त्यांनाही आता या आधारभूत किंमतीचा लाभ घेण्याची संधी मिळणार आहे. महाराष्ट्रातील हरभरा उत्पादकांसाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा असून, हजारो शेतकऱ्यांना थेट आर्थिक दिलासा मिळणार आहे.



## 'स्कायला ॲक्वेरियम व सी लायन मनोरंजन केंद्र' उभारणार

■ मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे

**मुंबई : हॅलो प्रभात**

पनवेल येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचा प्रस्तावित 'स्कायला ॲक्वेरियम व सी लायन मनोरंजन केंद्र' प्रकल्प उभारण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने नियोजन करावे, असे निर्देश मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिले.



या प्रकल्पासंदर्भात मंत्रालयात मत्स्यव्यवसाय मंत्री राणे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. बैठकीत आमदार विक्रांत पाटील यांनी प्रकल्पाबाबत सविस्तर निवेदन सादर केले. 'स्कायला ॲक्वेरियम व सी लायन मनोरंजन केंद्र' प्रकल्प देश-विदेशातील पर्यटकांना आकर्षित करणारा असावा. यासाठी सखोल अभ्यास करून सुस्पष्ट व व्यवहार्य आराखडा तयार करावा. शासनाच्या माध्यमातून आवश्यक ते मार्गदर्शन व सहकार्य करण्यात येईल, असेही मत्स्यव्यवसाय मंत्री राणे यांनी स्पष्ट केले.

पनवेल येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली अंतर्गत असलेले मत्स्य उपकेंद्र समुद्रमुखाजवळ स्थित असून सागरी व अंतर्जल परिसंस्थेच्या विकासासाठी अत्यंत उपयुक्त आहे. या ठिकाणी सुमारे १० एकर क्षेत्रावर 'स्कायला ॲक्वेरियम व सी लायन मनोरंजन केंद्र' उभारण्याचा प्रस्ताव आहे. प्रकल्पामध्ये जागतिक दर्जाचे सागरी व गोड्या पाण्यातील जीवसृष्टी प्रदर्शन तसेच सी लायन शोसारखे आकर्षक उपक्रम समाविष्ट करण्याची संकल्पना मांडण्यात आली आहे.


पनवेल हे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या जवळ असल्यामुळे या प्रकल्पाद्वारे देश-विदेशातील पर्यटकांना मोठ्या प्रमाणात आकर्षित करता येईल. तसेच पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचा अभ्यास आणि शैक्षणिक मूल्यवर्धनासाठीही हा प्रकल्प उपयुक्त ठरणार असल्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री राणे यांनी सांगितले. बैठकीत प्रकल्पाच्या व्यवहार्यता अभ्यासास गती देणे तसेच तज्ज्ञांचा सल्ला घेण्याचे निर्देश मत्स्यव्यवसाय मंत्री राणे यांनी दिले. बैठकीस आमदार विक्रांत पाटील, मत्स्यव्यवसाय विभागाच्या आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, महाराष्ट्र मत्स्यउद्योग महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश खपले, पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## पेमेंट्स प्रणालीमुळे वाढली समावेशन व कार्यक्षमता : नलिन बन्सल

**मुंबई : हॅलो प्रभात**

तंत्रज्ञानाच्या वेगाने बदलणाऱ्या युगात एआय आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा स्वीकारणे अत्यावश्यक आहे. हे केवळ तंत्रज्ञान क्षेत्रापुरते मर्यादित नसून सर्व क्षेत्रांमध्ये लागू आहे, ते स्वीकारले नाही तर आपण मागे पडू, असे स्पष्ट मत एनपीसीआयचे मुख्य रिलेशनशिप मॅनेजमेंट-भागीदारी नलिन बन्सल यांनी व्यक्त केले. मंत्रालयात आयोजित 'टेक-वारी २.०' अंतर्गत डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा : पेमेंट्स आणि सेवा या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून ते मार्गदर्शन करत होते.

लेखा व कोषागार विभागाच्या प्रधान सचिव रिचा बागला यांनी या सत्राचे प्रास्ताविक केले. डिजिटल पेमेंट्स प्रणालीमुळे व्यवहार अधिक पारदर्शक, जलद आणि उत्तरदायी झाल्याचे त्यांनी प्रास्ताविकात सांगितले. यावेळी




प्रमुख वक्ता म्हणून बोलताना नलिन बन्सल म्हणाले की, भारतातील डिजिटल पेमेंट्स आणि वित्तीय प्रणाली ही एका दिवसात तयार झालेली नसून, गेल्या अनेक दशकांतील सातत्यपूर्ण धोरणे, नवकल्पना आणि समन्वयाचा परिणाम आहे. बँकिंग क्षेत्रातील बदल, मोबाईल क्रांती, आधारसारखी ओळख प्रणाली आणि डिजिटल नवकल्पना यामुळे आजची सक्षम डिजिटल अर्थव्यवस्था उभी राहिली आहे. यूपीआयसारख्या प्रणालींमुळे देशात मोठ्या प्रमाणावर आर्थिक समावेशन साध्य झाले आहे. आज लाखो नागरिक आणि लघुउद्योग डिजिटल व्यवहार करत असून, व्यवहारांची कार्यक्षमता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. केवायसीसारख्या प्रक्रियांचा खर्च लक्षणीयरित्या कमी झाला असून कर्ज वितरण, विमा आणि गुंतवणूक सेवांमध्येही सुलभता आली आहे. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांचे वैशिष्ट्य म्हणजे या प्रणाली एका सक्षम आणि विश्वासार्ह संस्थेच्या चौकटीत चालतात. शासन, बँका, तंत्रज्ञान संस्था आणि नियामक यांचा समन्वय असल्याशिवाय या प्रणाली यशस्वी होत नाहीत, असे त्यांनी नमूद केले.

बन्सल यांनी जलद आणि पारदर्शक व्यवहाराची विविध उदाहरणे देताना सांगितले की, थेट लाभ हस्तांतरण, आधार-आधारित पेमेंट्स, यूपीआय, ई-मँडेट यासारख्या प्रणालींमुळे नागरिकांना जलद सेवा मिळत आहे. भविष्यात यूपीआयद्वारे कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू असून, त्यामुळे लहान व्यवहारांसाठी त्वरित कर्ज मिळू शकणार आहे. ते म्हणाले की, देशात अजूनही मोठा वर्ग डिजिटल प्रणालीपासून दूर आहे. या वर्गाला तंत्रज्ञान समजावून सांगणे, विश्वास निर्माण करणे आणि त्यांच्यापर्यंत सेवा पोहोचवणे ही पुढील मोठी जबाबदारी आहे. समावेशन आणि कार्यक्षमता हीच डिजिटल पायाभूत सुविधांची खरी ताकद आहे, असे त्यांनी यावेळी अधोरेखित केले. एआयच्या संदर्भात बोलताना त्यांनी सांगितले की, डेटा विश्लेषण, फसवणूक ओळख, ग्राहक सेवा आणि निर्णय प्रक्रिया या क्षेत्रांमध्ये एआयचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होणार आहे. तसेच ब्लॉकचेनसारख्या तंत्रज्ञानामुळे व्यवहारांसोबत मालकी हक्कही एकाच प्रणालीत हस्तांतरित होऊ शकतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

## तणाव विरहित जीवनासाठी मनाचे नियंत्रण आवश्यक

**मुंबई : हॅलो प्रभात**

ताण विरहित जीवनासाठी सकारात्मक वृत्ती, मनाचे नियंत्रण, योग्य विचार आणि व्यवहारातील संतुलन आवश्यक असल्याचे मत लोणावळा येथील मनशक्ती प्रयोग केंद्राचे सुहास गुढाते यांनी व्यक्त केले. यांनी सामान्य प्रशासन विभागाच्यावतीने आयोजित 'टेक वारी- २.० अंतर्गत' महाराष्ट्र प्रशिक्षण सप्ताह' कार्यक्रमात तणाव व्यवस्थापन याविषयी आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. ताण-तणावाचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी अंतर्मनातील आवाज ऐकण्याची गरज असल्याचे अधोरेखित करत सुहास गुढाते म्हणाले, दैनंदिन जीवनात प्रतिकूल व्यक्ती, परिस्थिती, नातेसंबंध, वाहतूक, प्रदूषण आणि महागाई यासारख्या अनेक घटकांमुळे निर्माण होणारा ताण गुंतागुंतीचा ठरते. ताण हा केवळ दुःखाशी संबंधित नसून आनंदाच्या क्षणातही तो अनुभवण्यास येतो. ताणाचा मनाशी असलेला संबंध अधोरेखित करत ते म्हणाले, माणूस हा शरीर आणि मन या दोन घटकांचा बनलेला असून ताणमुक्तीची गरज मनाला असते. आंतरव्यक्ती संबंधांमधील मतभेद आणि अपेक्षा यादेखील ताणाचे महत्त्वाचे कारण ठरतात. कुटुंब हा ताणमुक्तीचा आधार असून प्रत्येकाने स्वतःचा स्वभाव आणि क्षमता समजून घेतल्यास ताण कमी करण्यास मदत होऊ शकते. कामाच्या ठिकाणी ताण येऊ नये म्हणून आपल्या क्षमतांचा, कौशल्यांचा विकास करणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले

# १९ माध्यमिक शाळांची उच्च माध्यमिकमध्ये श्रेणीवाढ

**मुंबई : हॅलो प्रभात**

आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून स्वयंसेवी संस्थांकडून चालविण्यात येणाऱ्या पाच प्राथमिक आश्रमशाळांची माध्यमिक स्तरापर्यंत आणि १९ माध्यमिक शाळांची उच्च माध्यमिक – कनिष्ठ महाविद्यालय स्तरापर्यंत श्रेणीवाढ करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या निर्णयामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस मोठा हातभार लागणार आहे. या आश्रमशाळांची श्रेणीवाढ केल्याने आवश्यक अशा पदनिर्मितीस व त्याकरिता खर्चाच्या तरतूदीस देखील मंजुरी देण्यात आली. यामुळे राज्यातील डोंगराळ, दुर्गम भागातील आदिवासी बांधवांच्या मुलांचे शिक्षण गतीमान होणार आहे. राज्यातील डोंगराळ व दुर्गम भागातील आदिवासींमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी १९७२-७३ पासून "आश्रमशाळा



समूह" योजना सुरु केली आहे. या योजनेंतर्गत सध्या स्वयंसेवी संस्थाकडून ५५६ अनुदानित आश्रमशाळा चालविल्या जातात. त्यापैकी ३७ प्राथमिक अनुदानित आश्रमशाळा (इयत्ता १ ली ते ७ वी) व ३१९ माध्यमिक अनुदानित आश्रमशाळा (इयत्ता १ ली ते १० वी) आहेत. तसेच माध्यमिक आश्रमशाळा संलग्न २०० कनिष्ठ महाविद्यालये (इयत्ता १ ली ते १२ वी) सुरु आहेत. या शाळांमध्ये सुमारे २ लाख ६१ हजार ८३६ (१ लाख ४० हजार २५४ मुले आणि १ लाख २१ हजार ५८२ मुली) विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या आश्रमशाळा दुर्गम,अतिदुर्गम, डोंगराळ किंवा नक्षलग्रस्त अशा भागात आहेत. घरच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे आदिवासी विद्यार्थी तालुका किंवा जिल्हयाच्या ठिकाणी जाऊन पुढील शिक्षण घेण्यास उत्सुक नसतात. त्यामुळे गळतीच्या प्रमाणात वाढ होऊन विद्यार्थी माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक शिक्षणापासून वंचित राहतात. त्यामध्ये विशेषतः मुलींची संख्या मोठी असते. यासाठी या विद्यार्थ्यांना त्यांच्या परिसरातच निवासी शिक्षण उपलब्ध करून देण्यावर शासनाचा भर आहे. याशिवाय राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगानेही आदिवासी विकास विभागाला अनुदानित आश्रमशाळांना प्रोत्साहन देण्याची शिफारस केली आहे.

त्यानुसार राज्यातील ५ प्राथमिक आश्रमशाळांची श्रेणीवाढ करुन तिथे आठवी वी ते दहावीचे वर्ग सुरु करण्यास तसेच माध्यमिक अनुदानित आदिवासी आश्रमशाळांमध्ये १८ ठिकाणी कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय (इयत्ता ११ वी व १२ वी कला व विज्ञान शाखा) व एका ठिकाणी केवळ ११ वी व १२ वी कला अशा १९ अनुदानित माध्यमिक आश्रमशाळा संलग्न कनिष्ठ महाविद्यालये सुरु करण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली.

श्रेणीवाढ करण्यात आलेल्या पाच प्राथमिक आश्रमशाळा : श्री महात्मा मुंगसाजी शिक्षण संस्थेची आश्रमशाळा, बाळापूर आखाडा, ता. कळमनुरी, जि. हिंगोली. अश्वमेघ जीवन विकास प्रेरणा संस्था, चतुरजी उके, आदिवासी अनुदानित आश्रमशाळा, रेवसा, ता.जि. अमरावती. आदिवासी उन्नती सेवा मंडळ, अनु. प्राथ आश्रमशाळा, राजूर, ता. अकोले, जि. अहिल्यानगर. सुभाष शिक्षण प्रसारक मंडळ अनु. आश्रमशाळा, मांडवा, ता. किनवट, जि. नांदेड. सद्‌गुरू दत्त धार्मिक एवं पारमार्थिक ट्रस्ट, इंदोर संचलित सुर्योदय पारधी समाज आदिवासी अनुदानित आश्रमशाळा, सजनपुरी, ता. खामगाव जि. बुलढाणा

**श्रेणीवाढ करण्यात आलेल्या १९ अनुदानित माध्यमिक आश्रमशाळा : मार्की, ता. झरी जामणी, जि. यवतमाळ. खापरी, ता. कळमेश्वर, जि. नागपूर. वीर बिरसामुंडा अनुदानित आश्रमशाळा, सालेकसा, ता. सालेकसा, जि. गोंदिया. गोंडपिंपरी, ता. गोंडपिंपरी, जि. चंद्रपूर. गोजोली, ता. गोंडपिंपरी, जि.चंद्रपूर. श्रीमती विठाबाई मुन अनुदानित आश्रमशाळा, डोंगरगाव, ता. मुल, जि. चंद्रपूर. वायंगाव निपाणी, ता. जि. वर्धा. आश्रमशाळा गडद, ता. नवापुर, जि. नंदुरबार. अनुदानित आश्रम शाळा, गुही, ता. सुरगाणा, जि. नाशिक. अनुदानित माध्यमिक आश्रमशाळा, बिलाडी, ता.जि.धुळे. अनुदानित आश्रमशाळा, नारा, ता. कारंजा, जि. वर्धा. अनुदानित शाळा. आश्रम शाळा, अंतुर्ली, ता. अमळनेर, जि. जळगाव. श्री. गजानन महाराज अनुदानित आदिवासी आश्रम शाळा, शेगाव ता. शेगाव, जि. बुलढाणा. अनुदानित आश्रम शाळा, उत्तेखोल, ता. माणगाव, जि. रायगड. स्व. गंगाधरराव कोरडे अनुदानित आदिवासी प्राथ. / माध्य. आश्रमशाळा पिठोरी, ता. नरखेड, जि. नागपूर. राजीव प्राथमिक व माध्यमिक अनुदानित आश्रमशाळा, पाटण, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ. पुनरुत्थान समरसता गुरूकुल अनुदानित माध्यमिक आश्रमशाळा, चिंचवडगाव, पुणे. मातोश्री मिराबाई अनुदानित प्राथ. व माध्य. आश्रमशाळा, नवेगांव धापे, ता. जि. गोंदिया. अनुदानित आश्रमशाळा देवठाण, ता. अकोले जि. अहिल्यानगर. या पाच प्राथमिक आश्रमशाळांची माध्यमिक आश्रमशाळांमध्ये श्रेणीवाढ केल्याने आवश्यक शिक्षकांची ३० नियमित पदे व २५ बहुउद्देशीय कर्मचाऱ्यांची २५ पदे यांच्या पदनिर्मितीस तसेच १९ कनिष्ठ महाविद्यालयांसाठी आवश्यक १४८ शिक्षकांच्या नियमित पदनिर्मितीस व या सर्व पदांच्या आवश्यक खर्चाच्या तरतूदीस मान्यता देण्यात आली.**

## थोडक्यात पण महत्वाचे

### कोपरगावातील सार्वजनिक स्वच्छतागृहांचा प्रश्न मार्गी

**कोपरगाव : हॅलो प्रभात**



■ १ कोटी ३० लाख निधी मंजूर

कोपरगाव शहरातील सार्वजनिक स्वच्छतागृहांचा दीर्घकालीन प्रश्न लवकरच सुटणार असून स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत नगरपरिषदेला १ कोटी ३० लाख रुपयांचा निधी मंजूर झाल्याची माहिती नगराध्यक्ष पराग संधान यांनी दिली. या निधीतून सामुदायिक व सार्वजनिक स्वच्छतागृहांची उभारणी, दुरुस्ती व पुनर्बांधणी केली जाणार आहे. पहिल्या टप्प्यात ७५ आसनांना मंजुरी मिळाली असून आणखी ७५ आसनांसाठी प्रक्रिया सुरू आहे. नगराध्यक्ष संधान म्हणाले, शहरात येणारे ग्रामीण भागातील नागरिक, व्यापारी तसेच महिलांना स्वच्छ व सुलभ स्वच्छतागृहांची मोठी अडचण भासत होती. ही समस्या लक्षात घेऊन शहरातील विविध भागांत आधुनिक व सुसज्ज स्वच्छतागृह उभारण्यात येणार आहेत. या निधीसाठी आमदार स्नेहलता कोल्हे व विवेककोल्हे यांचे विशेष सहकार्य लाभल्याचे त्यांनी सांगितले. उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर व आरोग्य सभापती वैभव आढाव यांच्या देखरेखीखाली कामे वेगाने पूर्ण करण्यात येणार आहेत. या उपक्रमामुळे शहराच्या स्वच्छतेत भर पडून नागरिकांची मोठी सोय होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### पीकविमा मदत मिळाल्याने शेतकऱ्यांना दिलासा : आ. विवेक कोल्हे

**कोपरगाव : हॅलो प्रभात**



■ शासनाचे आभार : आ. विवेक कोल्हे

कोपरगाव व राहाता तालुक्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२५ मधील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाची पंतप्रधान पीकविमा योजनेअंतर्गत उत्पादनाधारित नुकसानभरपाई थेट बँक खात्यात जमा करण्यात आल्याची माहिती आ. विवेक कोल्हे यांनी दिली. याबद्दल त्यांनी शासनाचे आभार मानले. मागील खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयाबीन, बाजरी, कापूस, तूर तसेच चारा पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. काढणीच्या उंबरठ्यावर असलेली पिके भुईसपाट झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर स्नेहलता कोल्हे यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. त्यानंतर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत मंजूर करण्यात आली. या मदतीबद्दल आ. विवेक कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, कृषिमंत्री दत्ता भरणे तसेच शासनाचे आभार व्यक्त केले. या आर्थिक सहाय्यामुळे शेतकऱ्यांना आगामी हंगामासाठी भांडवल उपलब्ध होऊन मोठा दिलासा मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे. तसेच प्रलंबित मंडळांनाही लवकर मदत मिळावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

### समग्र शिक्षा कर्मचाऱ्यांचे आंदोलन तीव्र; महिलांचा आंदोलनाचा इशारा

**राहुरी : हॅलो प्रभात**

समग्र शिक्षा अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे आंदोलन आता तीव्र झाले असून महाराष्ट्रात प्रथमच महिला कर्मचारी मुंडण आंदोलन करणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. राज्यातील तीन हजारांहून अधिक कर्मचारी ९ मार्चपासून मुंबईतील आझाद मैदानावर बेमुदत आंदोलन करत आहेत. कर्मचाऱ्यांच्या नियमितीकरणाच्या मागणीसाठी यापूर्वी २० एप्रिल रोजी पुरुष कर्मचाऱ्यांनी मुंडण आंदोलन केले होते. मात्र शासनाकडून अद्याप ठोस निर्णय न झाल्याने आता महिला कर्मचारीही आंदोलनात उतरणार आहेत. ७ मेपर्यंत निर्णय न झाल्यास ८ मे रोजी महिला मुंडण आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन शासनाला देण्यात आले आहे. समग्र शिक्षा अभियान २००१ पासून सुरू असून विषयसाधन व्यक्ती, विशेष शिक्षक, लेखा कर्मचारी, माहिती समन्वयक, अभियंते आदी पदांवर अनेक कर्मचारी गेली २० ते २५ वर्षे मानधनावर कार्यरत आहेत. आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार या कालावधीत २५७ कर्मचारी सेवेत असतानाच मृत्यूमुखी पडले. रस्ता रोको, रक्ताने पत्र, वृक्ष चढाई, थाळीनाद, पुरुषांचे मुंडण अशा विविध आंदोलनांनंतरही शासनाने दखल घेतली नसल्याची खंत कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली. विशेष म्हणजे विरोधी पक्षात असताना विद्यमान सत्ताधाऱ्यांनी नियमितीकरणाचे आश्वासन दिले होते. त्यामुळे आता शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.



### इन्फोसेस स्प्रिंगगार्डमधून विद्यार्थ्यांना अनोखा अनुभव

**वांबोरी : हॅलो प्रभात**

राहुरी तालुक्यातील खडांबे खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इन्फोसेस स्प्रिंगगार्डच्या 'मेकर लॅब व्हील' उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना विज्ञान व तंत्रज्ञानाचा प्रेरणादायी अनुभव देण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा या उद्देशाने आयोजित उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी ऊर्जा रूपांतरण, टॅब हाताळणी, थ्रीडी प्रिंटर, कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाची प्राथमिक माहिती तसेच विविध प्रयोग प्रत्यक्ष करून पाहिले. "अंधश्रद्धेला नाही थारा, विज्ञानाची कास धरा" या संदेशातून विद्यार्थ्यांनी मनातील शंका विचारत विज्ञानाचे धडे अनुभवातून घेतले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देत कृतीतून शिकण्याची संधी मिळाल्याने पालक व शिक्षकांनी उपक्रमाचे कौतुक केले. मोबाईल प्रयोगशाळेमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून विज्ञानाविषयी कुतूहल निर्माण झाल्याचे मत व्यक्त करण्यात आले. या उपक्रमासाठी लेखाधिकारी रमेश कासार यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच श्री तुंबारे, सौ. कार्ले, श्री बोरुडे, शाळा व्यवस्थापन समिती, माजी विद्यार्थी संघ आणि ग्रामस्थांनी सहकार्य केले.

# वाघोलीत स्वच्छतेसाठी 'इंदूर पॅटर्न'चा मोठा निर्णय

■ ४० कचरा संकलन गाड्या आणि रोड स्वीपर लवकरच होणार कार्यरत

■ आ. माऊली कटके यांची माहिती



> वाघोलीतील वाढत्या कचरा समस्येवर प्रभावी तोडगा काढण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. आता ४० कचरा संकलन गाड्या आणि रोड स्वीपर मशीन सुरू होत असल्याने स्वच्छतेत मोठा बदल दिसेल. इंदूर पॅटर्नच्या धर्तीवर काम करत ट्रॅकिंग सिस्टीमद्वारे जबाबदारी निश्चित केली जाईल आणि वाघोली स्वच्छ व सुंदर ठेवण्यावर भर दिला जाईल.
> - ज्ञानेश्वरआबा कटके,आमदार, शिरूर-हवेली

**वाघोली : हॅलो प्रभात**

वाघोली हा भौगोलिक दृष्ट्या विस्तीर्ण परिसर असून, गेल्या पाच वर्षांत पुणे महानगरपालिका स्वच्छतेच्या बाबतीत अपेक्षेप्रमाणे काम करू शकली नसल्याची नागरिकांची भावना आहे. विशेषतः कचऱ्याची समस्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने नागरिक त्रस्त आहेत. याच पार्श्वभूमीवर वाघोली येथे 'इंदूर पॅटर्न' राबविला जात जाणार आहे. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

या पार्श्वभूमीवर शिरूर-हवेलीचे आमदार माऊली आबा कटके यांनी वेळोवेळी पुणे महापालिकेकडे पाठपुरावा करून इंदूर पॅटर्नच्या धर्तीवर कचरा व्यवस्थापन राबवण्याची मागणी केली होती. त्यानुसार कचरा संकलनासाठी ४२ गाड्यांची मागणी करण्यात आली होती. या मागणीला प्रतिसाद देत महानगरपालिकेकडून भाडेतत्त्वावर घेतलेल्या सुमारे ४० कचरा संकलन गाड्या पुढील पंधरा दिवसांत वाघोलीतील कोटी 'अ' आणि 'ब' भागात उपलब्ध होणार आहेत. यामुळे कचरा संकलनाची गती वाढून परिसर स्वच्छ राहण्यास मदत होणार आहे.

तसेच मुख्य रस्त्यांच्या स्वच्छतेसाठी रोड स्वीपर मशीनचीही मागणी करण्यात आली असून, ती लवकरच कार्यान्वित होण्याची शक्यता आहे. या उपाययोजनांमुळे रस्त्यांवर कचऱ्याचे ढीग दिसणार नाहीत, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. दरम्यान, स्वच्छतेच्या कामावर अधिक नियंत्रण ठेवण्यासाठी ट्रॅकिंग सिस्टीमचा वापर करण्यात येणार असून, कुठेही कचरा साचलेला आढळल्यास संबंधित मुकादमांना जबाबदार धरले जाणार आहे. या निर्णयामुळे वाघोलीतील स्वच्छतेच्या समस्येला मोठ्या प्रमाणात दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.



## बारामतीत चार महापुरुषांची संयुक्त जयंती उत्साहात

**बारामती शहर : हॅलो प्रभात**

■ सामाजिक ऐक्याचा संदेश

तथागत भगवान गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त बारामती शहरात भव्य कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास नागरिकांचा लक्षणीय सहभाग पाहायला मिळाला. भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त उत्सव समिती व संघर्षशक्ती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने स्नेहभोजन व भेटवस्तू वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी सामाजिक समता, बंधुता आणि ऐक्याचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते योगेंद्रदादा पवार उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून किरणभाऊ इंगळे (नगरसेवक), राजेंद्रनाना सोनवणे, प्रशांत सातव, प्रतीकशेठ ढवाण-पाटील, अभिजित घाडगे, विशाल हिंगणे, गणेश जोजारे, विशाल जाधव यांच्यासह विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने महिला व पुरुष नागरिक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी आयोजकांनी परिश्रम घेतले.

## आंबेगाव : विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक जिज्ञासेला चालना

**पुणे : हॅलो प्रभात**

शिक्षण म्हणजे फक्त वर्गात शिकवलं जातं तेवढेच नसतं. पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यवहारी ज्ञान, विविध कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजवली पाहिजे. शिक्षणाचा दर्जा वाढवला पाहिजे. आपली मुले जगाच्या स्पर्धेत पाठवायची असतील तर शाळा शाळांतून विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले पाहिजेत. पंचायत समिती आंबेगाव शिक्षण विभागाने आयुकाच्या सहकार्याने राबविलेला आंबेगाव सुपर 23 उपक्रम अत्यंत स्तुत्य असून विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक व जिज्ञासूवृत्तींला वाव देणारा आहे असे गौरवोद्गार महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी काढले. घोडेगाव (ता आंबेगाव) येथील तहसील कार्यालयात आंबेगाव सुपर 23 व इंग्लिश टॅलेंट सर्च मधील यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ संपन्न झाला. याप्रसंगी वळसे पाटील बोलत होते. विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनाचे ध्येय निश्चित करा आणि ध्येयाचा पाठलाग करा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. आंबेगाव सुपर 23 मधील यशस्वी विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षक,इंग्लिश टॅलेंट सर्च स्पर्धेतील तालुक्यातील पहिले पाच विद्यार्थी यांचा गौरव प्रशस्तीपत्र व मेडल देऊन करण्यात आला.

## पाणीटंचाई व आपत्ती काळात यंत्रणांनी सतर्क राहावे

**सातारा : हॅलो प्रभात**

सूर्यकांत पाटणकर



जिल्हाधिकारी संतोष पाटील

पाणीटंचाई तसेच आपत्तीजनक परिस्थितीत सर्व शासकीय यंत्रणांनी सतर्क व सज्ज राहावे, असे निर्देश जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी दिले. मान्सूनपूर्व आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी त्यांनी प्रत्येक विभागाने आपला अद्ययावत आपत्ती व्यवस्थापन आराखडा 20 मे 2026 पर्यंत सादर करावा तसेच तालुका व गावपातळीवर 15 मेपूर्वी पूर्वतयारी बैठका घ्याव्यात, अशा सूचना दिल्या. हवामान खात्याने यंदा कमी पावसाचा अंदाज वर्तविल्याने टंचाई आराखडा तयार करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. पाणीपुरवठा व सिंचन विभागाने जलस्त्रोतांची तातडीने मॅपिंग करावी, असेही त्यांनी सांगितले. प्रत्येक विभागाने नोडल अधिकारी नेमून 1 जूनपासून 24x7 नियंत्रण कक्ष कार्यान्वित करावा. शोध व बचाव साहित्याची चाचणी 25 मेपूर्वी पूर्ण करावी, तसेच आपत्कालीन घटनेत तात्काळ संपर्क यंत्रणा सक्रिय ठेवावी, असे निर्देश देण्यात आले. महसूल विभागाला धोकादायक भागातील नागरिकांचे स्थलांतर, पूरग्रस्त भागात अन्नधान्य पुरवठा व नालेसफाईची कामे पूर्ण करण्यास सांगण्यात आले. आरोग्य विभागाने औषधसाठा, पाणी शुद्धीकरण उपाययोजना व रुग्णवाहिका सज्ज ठेवाव्यात. पाटबंधारे विभागाने धरणनिहाय आपत्कालीन आराखडे तयार करावेत, तर विद्युत विभागाने वीजपुरवठा सुरक्षिततेच्या उपाययोजना कराव्यात. बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी यशनी नागराजन, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील व विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. संभाव्य आपत्तींचा सामना करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

## विजयमाला कदम प्रशालेची दमदार कामगिरी

### चार विद्यार्थ्यांची राष्ट्रीय गतका स्पर्धेसाठी निवड

**विटा : हॅलो प्रभात**



महाराष्ट्र शासन व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, ठाणे यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय शालेय गतका १७ वर्षे मुले (फरी सोटी-सांघिक) स्पर्धेत विटा येथील भारतमाता ज्ञानपीठ संचलित सौ. विजयमाला पतंगराव कदम प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशाच्या जोरावर विद्यालयातील चार विद्यार्थ्यांची राष्ट्रीय शालेय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

नारायण मोगरे, तनय तारळेकर, आयुष यादव आणि आदित्य जाधव या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कौशल्य, शिस्तबद्ध खेळ आणि सांघिक समन्वयाचे प्रभावी प्रदर्शन करत राज्यस्तरीय स्पर्धेत आपली छाप पाडली. त्यांच्या या कामगिरीमुळे राष्ट्रीय स्तरावर खेळण्याची संधी त्यांना मिळाली आहे.

या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक असिफ मुजावर व डॉ. रवी पवार यांचे मार्गदर्शन लाभले. नियमित सराव, योग्य प्रशिक्षण आणि शिस्तीमुळे हे यश प्राप्त झाल्याचे शिक्षकांनी सांगितले. या यशाबद्दल शाळेच्या प्राचार्या वैशाली कोळेकर, संस्थेच्या अध्यक्षा रेखा शेंडगे, संस्थापक रघुराज मेटकरी, कार्यवाह योगेश्वर मेटकरी तसेच शालेय व्यवस्थापन समिती व पालक वर्ग यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे विटा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पुढील राष्ट्रीय स्पर्धेतही हे विद्यार्थी उत्कृष्ट कामगिरी करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## पेट्रोल टँकर वेल्डिंगदरम्यान भीषण स्फोट; कामगार जखमी

**पुणे : हॅलो प्रभात**

पुणे येथील पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या माळी मळा परिसरात आज मंगळवारी (५ मे) रोजी सकाळी पेट्रोलजन्य टँकरच्या वेल्डिंगचे काम सुरू असताना टाकीत असलेल्या गॅसमुळे अचानक झालेल्या स्फोटात भाजल्यामुळे एक कामगार गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर पुण्यातील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार लोणी काळभोर ग्रामपंचायत हद्दीतील माळी मळा परिसरातील 'भारत वेल्डिंग वर्क्स' या वर्कशॉपमध्ये मंगळवारी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारांस टँकरच्या दुरुस्तीचे काम सुरू होते. काम सुरू असतानाच अचानक मोठा स्फोट झाला. स्फोटाची तीव्रता इतकी होती की वरील पत्र्याचे शेड तुटून पत्रे बाजूला उडून पडले. या घटनेत चांद बाबू हा कामगार गंभीर भाजला. स्फोटानंतर तो शेडखाली अडकला होता. घटनेची माहिती मिळताच माजी उपसरपंच राजेंद्र काळभोर यांचेसह अजय मोरे, अनिरुद्ध मराठे आणि रामा काळे यांनी प्रसंगावधान दाखवत जखमीला बाहेर काढले आणि तातडीने रुग्णवाहिका बोलावून पुण्यातील रुग्णालयात उपचारासाठी पाठवले. स्फोटात टँकरचे मोठे नुकसान झाले असून काही अंतरावरपर्यंत आवाज ऐकू गेल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

## नसरापूर बालिका अत्याचार प्रकरणी निषेध



**टेंभुर्णी : हॅलो प्रभात**

पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे घडलेल्या तीन वर्षांच्या बालिकेवरील लैंगिक अत्याचार व निर्घृण हत्येच्या घटनेने संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे. या अमानुष घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत आरोपीस कठोरात कठोर शिक्षा करण्यात यावी, अशी मागणी सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने करण्यात आली. या संदर्भात माननीय पोलीस निरीक्षक, टेंभुर्णी यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात संबंधित प्रकरणाची सखोल व जलद चौकशी करून दोषीवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्यासाठी ठोस उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदन देताना वैभव कुलकर्णी, सुधाकर जोशी, सदाशिव ठोंबरे, मिलिंद कुलकर्णी, किशोर कुरुडकर, विनायक टल्लू, प्रमोद पाठक, वैभव टल्लू, पत्रकार दीपक देशपांडे, आदींसह समाजातील अनेक बांधव उपस्थित होते. दरम्यान, या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीती व संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, न्याय मिळावा अशी सर्वसामान्यांची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## व्यवसायात मूल्यांचे निर्विवाद महत्त्व

**पुणे : हॅलो प्रभात**




व्यवसायात तसेच एकूण जीवनातही मूल्यांचे महत्त्व निर्विवाद आहे. मूल्यांचे पालन व्यक्तीला अपार शक्ती प्रदान करते, त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत मूल्यांशी तडजोड करता कामा नये, असे प्रतिपादन ज्येष्ठ उद्योजक व वायुसेनेचे निवृत्त अधिकारी रमेश अग्रवाल यांनी केले.

पुणे ब्रदरहुड फाउंडेशनच्या नव्या कार्यकारिणीच्या पदग्रहण सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी उद्योजक नरेंद्र गोयल यांनी माजी अध्यक्ष सागर अग्रवाल यांच्याकडून अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली.

या कार्यक्रमास संस्थापक अध्यक्ष ईश्वरचंद गोयल, कार्यकारी संचालक पवन बंसल, संजय अग्रवाल, सेवा भारती पश्चिम महाराष्ट्रचे कोषाध्यक्ष सुधीर जावळेकर, द्वारका जालान, जीतो एपेक्सचे अध्यक्ष विजय भंडारी, मनोज छाजेड, सीए जितेश अग्रवाल, रूची गोयल, गीता गोयल, कांता गोयल, रामशरण गुप्ता, प्रेमचंद मित्तल, जय भगवान गोयल यांसह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

रमेश अग्रवाल म्हणाले की, प्रत्येक उद्योजक आपल्या व्यवसायाच्या प्रगतीसाठी एक ठराविक दृष्टीकोन ठेवतो आणि त्यानुसार कार्यपद्धती ठरवतो. त्याचप्रमाणे व्यवसाय करताना मूल्यांचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. व्यवसायात मूल्यांचा पाया नसेल, तर त्या दृष्टीकोनालाच धक्का बसू शकतो.

कर्मचाऱ्यांच्या भूमिकेवर प्रकाश टाकताना त्यांनी सांगितले की, कोणत्याही व्यवसायाच्या यशामध्ये कर्मचाऱ्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असते. त्यामुळे त्यांना केवळ कर्मचारी म्हणून नव्हे, तर सहकारी म्हणून वागणूक द्यावी. त्यांना कुटुंबाचा भाग मानल्यास त्यांच्यात आपलेपणा निर्माण होतो आणि ते प्रत्येक परिस्थितीत ठामपणे सोबत उभे राहतात.

ते पुढे म्हणाले की, "शंभर मूर्तींची पूजा करण्यापेक्षा शंभर हातांना कौशल्य देणे अधिक महत्त्वाचे आहे." कुशल हात स्वतःच्या, कुटुंबाच्या, समाजाच्या आणि राष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी मोठे योगदान देतात.

नवीन अध्यक्ष नरेंद्र गोयल यांनी सांगितले की, पुणे ब्रदरहुड फाउंडेशनने गेल्या २७ वर्षांत उल्लेखनीय प्रगती केली आहे. या मंचाच्या माध्यमातून समाजातील लोकांना वैयक्तिक व व्यावसायिक नातेसंबंध विकसित करण्याची संधी मिळते. त्यांनी आपल्या कार्यकाळात कार्यक्रमांची संख्या वाढविणे, सदस्यांचा सहभाग वाढविणे, महिलांच्या सहभागाला प्रोत्साहन देणे आणि नव्या पिढीला संस्थेशी जोडण्याचा संकल्प व्यक्त केला. नवी कार्यकारिणी पुढीलप्रमाणे : नरेंद्र गोयल (अध्यक्ष), अरविंद अग्रवाल (सचिव), संदीप पी. अग्रवाल – सीए (कोषाध्यक्ष), योगेश जैन (संयुक्त सचिव), सागर अग्रवाल (आयपीपी), संजय बी. अग्रवाल (उपाध्यक्ष), मुकेश कानोडिया (उपाध्यक्ष–१), संजय बंसल, अरुण कुमार सिंघल, राकेश अग्रवाल, प्रशांत अग्रवाल, जितेंद्र बंसल, राजेश एस. मित्तल, शैलेश अग्रवाल, अजय जिंदल, अनूप गर्ग.